रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक १५६ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर २०२५

किंमत ४ ₹

## एमपीएससीच्या लाखो विद्यार्थ्यांवर गंडांतर

**नागपूर :** आगामी काळात महापालिकेच्या निवडणुका होणार आहेत. या अनुषंगाने राज्य सरकारला मनुष्यबळाची मोठी गरज भासणार आहे. यासाठी एमपीएससीमार्फत पदभरती करणे सोडून उपजिल्हाधिकारी ही पदे रिक्त नसतानाही जवळपास दीडशे तहसीलदारांना उपजिल्हाधिकारी पदावर पदोन्नती देण्यात येणार असल्याची माहिती आहे. यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध परीक्षांची तयारी करणाऱ्या उमेदवारांमध्ये खळबळ उडाली आहे. एमपीएससीच्या जागा कमी होण्याची शक्यता आहे. शिवाय उमेदवारांना थेट उपजिल्हाधिकारी पदावर नियुक्ती मिळण्याची शक्यता ही कमी होणार आहे. त्यामुळे यासाठी विरोध होत आहे.

## डोनाल्ड ट्रम्प युद्धाच्या तयारीत!

**अमेरिका :** अमेरिकेच्या कॅरेबियन सागरातील कारवाईमुळे नवे युद्ध भडकण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कारम ड्रग्ज तस्करांना रोखण्याचा उद्देश समोर ठेवून अमेरिकन सैनिक थेट जहाजांवर हल्ले करत आहेत. त्यामुळेच आता व्हेनेझुएला हा देश थेट अमिरेकेला भिडण्याच्या तयारीत आहेत. विशेष म्हणजे अमेरिकेचा आक्रमक पवित्रा लक्षात घेता कॅनडा आणि ब्रिटेन या दोन देशांनीही चिंता व्यक्त केली असून ड्रग्ज तस्करी करणाऱ्या जहाजांची गुप्त माहिती अमेरिकेला पुरवणे या दोन्ही देशांनी थांबवले आहे. त्यामुळेच आता अमेरिका आणि व्हेनेझुएला यांच्यात युद्ध भडकते की काय? अशी शंका आहे.

# सांबरकुंडचा मार्ग मोकळा

## 263 हेक्टर वनजमिनीचे जलसंपदाकडे हस्तांतरण



**। रायगड । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील प्रस्तावित सांबरकुंड धरणातील २६३ हेक्टर वनजमीन जलसंपदा विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. त्यामुळे लवकरच धरणाच्या कामाला गती मिळणार आहे.

अलिबाग तालुक्यातील शेतजमीन सिंचनाखाली यावी तसेच तालुक्यातील पाणी प्रश्न सुटावा यासाठी १९८२ साली या धरणाच्या कामाला मंजूरी देण्यात आली होती. मात्र निरनिराळ्या कारणांनी धरणाचे काम रखडले होते. यात वनजमिनींचा मोठा अडसर होता. तो आता दूर झाला आहे.

**सांबरकुंड धरणाचा कागदोपत्री मार्ग मोकळा झाला असला तरी भूसंपादनाचा शेतकऱ्यांना दिला जाणारा मोबदला तुटपुंजा आहे. शासनाच्या नियमानुसार भूसंपादनाला मिळणारा दर शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणारा आहे. यामुळे शेतकऱ्यांनी धरणाला विरोध नाही परंतु जमिनीला योग्य दर द्यावा अशी अनेकदा जिल्हा प्रशासनाकडे मागणी केली आहे. असे असताना शेतकऱ्यांना अपेक्षित असणारा दर शासनाने अद्याप जाहीर न केल्याने नाराजीचे वातावरण आहे.**

अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक नागपूर यांनी सांबरकुंड मध्यम सिंचन प्रकल्पासाठी २६३ हेक्टर वनजमीन वगळण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे सादर केला होता. त्यास मंजूरी देण्यात आली आहे. यानंतर ६ नोव्हेंबर २०२५ रोजी वनजमीन हस्तांतरणाचे आदेश वनविभागाने जारी केले आहे.

त्यामुळे तब्बल चार दशकांच्या प्रतिक्षेनंतर धरणाच्या कामाला सुरूवात होऊ शकणार आहे. पुण्यातील महालक्ष्मी इंटरप्रायझेस या कंपनीला धरणाच्या कामाचा ठेका देण्यात आला आहे. धरणाच्या पान २ वर




# सेवावर्गच्या नावाखाली लाखोंचा बाजार?

## मर्जीतील तलाठ्यांना आवडीच्या सजासाठी पाच लाखांची बोली?

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**मागील मे महिन्यात तलाठ्यांची अलिबाग तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यात नियमित बदली करण्यात आली. परंतु, काही मर्जीतील तलाठ्यांची बदली सेवावर्गच्या नावाखाली तीन महिन्यांत पुन्हा अलिबागमध्ये करण्यात आल्याची चर्चा सध्या महसूल विभागात सुरू आहे. आवडीच्या सजासाठी या तलाठ्यांना पाच लाख रुपये मोजावे लागल्याचेही बोलले जात आहे. त्यामुळे महसूल विभागातील लाखोंचा बाजार उघड होत आहे. हे तलाठी कोण आहेत, हे लवकरच उघड होणार आहे.**

जमिनीची नोंद ठेवणे, महसूल गोळा करणे, वारसा हक्कासाठी वारसांची नोंद करणे, आपत्कालीन परिस्थितीत नुकसान झालेली माहिती घेणे, शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचविणे, सभा बैठकांमधून माहिती देणे, नुकसानीचे पंचनामे करणे, ही कामे तलाठी अर्थात ग्राम महसूल अधिकारी यांच्यामार्फत केली जातात. रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाखांहून अधिक असून, एक हजारांहून अधिक गावे आहेत. जनता आणि प्रशासन यातील मधला दुवा म्हणून तलाठ्यांकडे पाहिले जाते. त्यामुळे ग्रामीण भागात तलाठ्यांचे प्रचंड महत्त्व आहे. अपुऱ्या मनुष्यबळामुळे एका तलाठ्याकडे दोन ते तीन सजांमधील कारभार सोपविला जात आहे. तर, काही तलाठ्यांकडे चार सजा दिले जात असल्याचेही बोलले जात आहे. तरीदेखील तलाठ्यांचे काम प्रामाणिकपणे करीत असतात. प्रशासकीय कामकाजासह वेगवेगळ्या नोंदीची माहिती ठेवणे, वरिष्ठांच्या बैठकामध्ये सहभागी होऊन कार्यवाही करणे, अशा अनेक प्रकारची कामे तलाठी करीत असतात.

रायगड जिल्ह्यात तलाठ्यांची ५१० पदे मंजूर असून, १०५ पदे रिक्त आहेत. त्यामुळे सध्या ३०५ तलाठी जिल्ह्यात कार्यरत आहेत. सहा वर्षे एका तालुक्यात, तसेच एका सजामध्ये तीन वर्षे सेवा केलेल्या तलाठ्यांची बदली मागील मे महिन्यात करण्यात आली. अलिबागसह अनेक तालुक्यांतील तलाठ्यांची वेगवेगळ्या तालुक्यात बदली झाली. सुमारे ४० हून अधिक तलाठ्यांची बदली करण्यात आली असल्याची माहिती पान २ वर

### सेवावर्ग बदलीचा असा कारभार

तालुक्यात नियमित बदली झालेल्या तलाठ्यांना सेवावर्ग म्हणून दुसऱ्या तालुक्यात घेतले जाते. त्या तलाठ्यांचे वेतन, सेवा पुस्तिका नियमित बदली झालेल्या तालुक्याच्या ठिकाणी राहणार, फक्त कामकाज दुसऱ्या तालुक्यातील सजामधून केले जाणार, असा हा कारभार चालतो.

## वेधक

### आमिष दाखवून युवतींवर बलात्कार

**पुणे :** विवाहाच्या आमिषाने वेगवेगळ्या घटनेत दोन युवतींवर बलात्कार करण्यात आल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी कोंढवा आणि हडपसर पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आला आहे. कोंढवा पोलिसांनी विवाहाच्या आमिषाने युवतीवर बलात्कार केल्याप्रकरणी एकाला अटक केली आहे. अनिकेत राकेश निकाळजे असे अटक केलेल्याचे नाव आहे. हडपसर भागात एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत एका युवतीने हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. विवाहाच्या आमिषाने एका महिलेवर बलात्कार केल्याची घटना उघडकीस आली आहे. महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, रुपेश साळवे (वय ३०, रा. अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी) याला अटक करण्यात आली.

### बारामतीत काका-पुतण्याची दिलजमाई

**बारामती :** बारामती नगरपरिषद हा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बालेकिल्ला मानला जातो. पवार कुटुंबाच्या होमपिचवर आता काका पुतण्या एकत्र येण्याची चिन्हं आहेत. अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या दोन्ही पक्षांची युती आगामी निवडणुकीतून दिसण्याची चिन्हे आहेत. अजित पवार हे शरद पवारांच्या पक्षासाठी नगरसेवक पदाच्या काही जागा सोडण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर बारामतीतून सुरुवात झाली, तर युती राज्यभरातही पोहोचू शकते. भाजपला इशारा देण्यासाठी खरोखरच अजित पवारांची शरद पवारांच्या पक्षाबरोबर दिलजमाई होणार हे येत्या काही दिवसांत ठरेल. या संभाव्य आघाडीची सुरुवात बारामतीतून होते का, याकडे राजकीय तज्ज्ञांचेही लक्ष आहे.

### लग्नाच्या स्टेजवर नवरदेवावर हल्ला

**अमरावती:** लग्नकार्यात गोंधळ किंवा पाहुणे मंडळींचा रुसवा फुगवा ही साधारण गोष्ट असते. मात्र अमरावतीमधील एका लग्नसमारंभात चक्क नवरदेवावरच जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. अमरावतीच्या बडनेरा रोडवरील साहिल लॉनमध्ये सुरू असलेल्या लग्नसमारंभात काल रात्री अचानक गोंधळ उडाला. साहिल लॉन येथे बडनेरा येथील सुजल समुद्रे याचा विवाह समारंभ सुरू असताना दोन युवकांनी नवरदेव सुजल समुद्रे याच्यावर धारदार चाकूने हल्ला केला. या हल्ल्याचे ड्रोन व्हिडिओ समोर आले आहेत. या हल्ल्यात नवरदेव सुजल हा जखमी झाला असून नववधू आणि नवरदेवाची आई दोघेही चक्कर येऊन घटनास्थळीच पडल्याची माहिती आहे. या घटनेनं लग्न समारंभात आणि पै-पाहुण्यात एकच खळबळ उडाली होती. याप्रकरणी, पोलिसांकडून आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

# शेवटच्या घटकापर्यंत कर्जमाफी करा

## जयंत पाटील यांचे मत | जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या पदाधिकारी व अधिकाऱ्यांची बैठक



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**यावर्षी संपूर्ण महाराष्ट्रात प्रचंड पाऊस पडला. भातपीकासह अन्य पिकांचे खुप नुकसान झाले. ओला दुष्काळ पडला आहे. रायगडसह कोकणातील चांगल्या पिकाचे नुकसान झाले. त्यामुळे कर्जमाफीबाबत चर्चा करण्यासाठी बैठक घेण्यात आली. या बैठकीत वेगळे धोरण ठरविण्यात आले. आगामी काळात पुणे येथील मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये सर्व मध्यवर्ती बँकेच्या काही अधिकाऱ्यांची बैठक घेऊन धोरण ठरविले जाणार आहे. हे धोरण घेऊन कर्जमाफी करीत असताना शेवटच्या स्तरापर्यंत पोहचली पाहिजे. योग्य माणसांना मिळाली पाहिजे, या धोरणात अंतर्भूत होणार अशी अपेक्षा आहे, असे मत रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केले.**

प्रस्तावित शेती कर्जमाफीबाबत अलिबागमधील चेंढरे येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्य कार्यालयातील सभागृहात बुधवारी (दि.१२) बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी जयंत पाटील बोलत होते. यावेळी अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष बच्चु कडू, उपाध्यक्ष अभिजीत ढेपे, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष सुरेश खैरे, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष सुनील चांदोरे, यवतमाळ पान २ वर

### कर्जमाफीबाबत सुटसुटीतपणा असावा- बच्चू कडू

कर्जमाफीचे जे धोरण स्वीकारले जाणार आहे. त्याबाबत जुन्या कर्ज थकीतदारांना मुदतवाढ दिली पाहिजे. मुदतवाढ देऊन नवीन कर्ज देण्याचे धोरण आखले पाहिजे. नवीन कर्ज शेतकऱ्यांना भेटले नाही, तर शेतकऱ्यांसमोर मोठी अडचण निर्माण होईल. ३१ मार्चपर्यंत तरतूद झाल्यानंतर एप्रिल महिन्यात जिल्हा मध्यवर्ती बँकेला माफीचे पैसे देणे गरजेचे आहे. काही मध्यवर्ती बँक थकीत कर्ज वसूली शिवाय नवीन कर्ज देऊ शकत नाही. पीक कर्जाचे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या बाबतीत एक वेगळे धोरण घेणे गरजेचे आहे. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात जिल्हा बँकेला माफीचे पैसे आवश्यक आहे. नवीन कर्ज देणे, थकीत कर्जाला मुदतवाढ देणे, माफ होणारे थकीत कर्जाची तरतूद करणे तसेच अनिष्ट तफावत याचा विचार होणे आवश्यक आहे. त्यावर वेगळे धोरण करणे आवश्यक आहे. राष्ट्रीयकृत बँकापेक्षा सर्वांत सुलभ, शेवटपर्यंत व्यवस्था करून देण्याचे काम जिल्हा मध्यवर्ती बँका करतात. लहानलहान गावात कर्ज वाटप केले जाते. त्याला भर देणे गरजेचे आहे. कर्जमाफीबाबत सुटसुटीतपणा आणि बँक अडचणीत येणार नाही, याचा विचार करणे गरजेचे आहे, असे बच्चू कडू म्हणाले. पुढे ते म्हणाले की, कर्जमाफीबाबत जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या असलेल्या अडचणीला कसे सामोरे जावे, याबाबत बैठक घेण्यात आली. ही बैठक नवीन इतिहास रचणारी आणि नवीन पर्वणी असणार आहे. कर्जमाफीची मुदत तीस जूनपर्यंत दिली आहे. राज्याती जिल्हा बँकेचे काय नुकसान होऊ शकते. काय अडचणी निर्माण होणार आहेत, कशा पध्दतीने सरकारने समोर गेले पाहिजे हे ठरणे महत्वाचे आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अडचणी वाढू नये, याची काळजी सरकारने घेणे फार महत्वाचे आहे. तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी २०१५ ते २०१९ पर्यंत कर्जमाफी केली. त्यावेळी दोन लाख कर्ज असणाऱ्यांना माफी मिळाली. परंतु दोन लाखपेक्षा अधिक कर्ज असणाऱ्यांना शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली नाही. या अडचणी वाढल्या आहेत. कर्जमाफी जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत कशी मिळेल. याबाबत विचार होणे गरजेचे आहे. मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अडचणी वाढू नये, यासाठी सरकारला प्रस्ताव दिला जाणार आहे, असेही बच्चु कडू यांनी सांगितले.

> सहकार चळवळीबरोबरच मध्यवर्ती बँकेमध्ये पहिल्यांदा ही बैठक होत आहे. बच्चू कडूंचे यामध्ये मोलाचे योगदान आहे. कर्जमाफी देताना दोष होऊ नये, यासाठी बैठकांच्या माध्यमातून भूमिका घेतली आहे. बैठक घेऊन एक धोरण ठरविले जाईल.
> – जयंत पाटील, अध्यक्ष, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

# मिनीडोअर चालक-मालक आक्रमक

## येत्या १९ नोव्हेंबरला अलिबागमध्ये मोर्चा काढण्याचा इशारा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

वयोमर्यादा संपुष्टात आल्यावर चालू स्थितीतील वाहने स्क्रॅपला जाण्याची भिती आहे. परवानेदेखील रद्द होऊन चालक व मालकांच्या व्यवसायावर त्याचा परिणाम होणार आहे. बदली वाहने शासनाकडे उपलब्ध नाहीत. बेरोजगारी व कौटुंबिक उपासमारी होण्याची शक्यता आहे. वयोमर्यादा वाढविण्याबाबत कार्यवाही केली जात नाही, असा आरोप करीत टॅक्सी चालक मालकांनी निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांची भेट घेऊन त्यांच्याकडे गाऱ्हाणे मांडले.

अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबतही नाराजी व्यक्त केली. मिनीडोअर चालक व मालकांनी आक्रमतेची भूमिका घेतली असून तातडीने १९ नोव्हेंबरला जिल्हाधिकारी कार्यवाही न झाल्यास येत्या कार्यालयावर मोर्चा पान २ वर



### चालक-मालकांवर आर्थिक संकट

जिल्ह्यातील विक्रम, मिनीडोअरची वयोमर्यादा संपुष्टात आल्यावर शासन निर्णयानुसार, ती वाहने स्क्रॅप केली जाणार आहेत. त्यामुळे चालक व मालकांची परवाने रद्द केली जातील. चालक व मालकांवर मोठे आर्थिक संकट निर्माण होईल. बैठक लावून प्रश्न मार्गी लावला नाहीतर चालक आणि मालकांवर उपासमारीची वेळ येईल.

## मुंबईसह ५ विमानतळं बॉम्बने उडवणार?

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

दिल्लीतील बॉम्बस्फोटाने संपूर्ण देशात खळबळ उडाली आहे. अशातच आता देशातील ५ विमानतळे बॉम्बने उडवून देणार असल्याची धमकी मिळाली आहे. इंडिगो एअरलाइन्सला आज दुपारी ३.३० वाजता देशातील ५ आंतरराष्ट्रीय विमानतळांना बॉम्बने उडवण्याची धमकी देण्याबाबत मेल मिळाला आहे. या ईमेलमध्ये दिल्ली, मुंबई, चेन्नई, त्रिवेंद्रम आणि हैदराबाद या पाच विमानतळांना बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली आहे. या धमकीनंतर आता सगळीकडे खळबळ उडाली असून सविस्तर चौकशी सुरू करण्यात आली आहे. मात्र हा मेल कुणी आणि कुठून पाठवला हे अद्याप समजू शकलेले नाही.

## दिल्ली स्फोटानंतर महाराष्ट्र एटीएसची मोठी कारवाई

# थेट मुंब्रातील शिक्षक ताब्यात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटाने देशात खळबळ उडाली. त्यामध्येच या प्रकरणात धक्कादायक खुलासे होताना दिसत आहेत. देशभरात स्फोटानंतर अलर्ट जारी करण्यात आला असून ठाणे जिल्ह्यातील एका शिक्षकाला एटीएसने ताब्यात घेतले आहे.



दिल्लीच्या लाल किल्ला परिसरात मोठा स्फोट झाला. या स्फोटाचे कनेक्शन थेट जम्मू काश्मीरपर्यंत पोहोचल्याने खळबळ उडाली. या प्रकरणात काही डॉक्टरांची नावे पुढे आली असून त्यांनी जानेवारी महिन्यातच लाल किल्ल्याची रेकी केल्याचे स्पष्ट झाले. पुलवामातील दहशतवादी उमर हा गाडी चालवत असल्याचे स्पष्ट झाले. आता स्फोटाचे महाराष्ट्रापर्यंत धागेदोरे पोहोचले आहेत. मागील काही दिवसांपासून या स्फोटाचा कट रचला जात असल्याचे स्पष्ट झाले. ११ तास गाडी दिल्लीमध्ये फिरत होती. दिल्लीच्या स्फोटाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र एटीएसकडून अत्यंत मोठी कारवाई करण्यात आली असून मुंब्रातील दोन जणांना एटीएसने ताब्यात घेतलंय. चार घरांवर छापेमारी करण्यात आली. त्यांची सध्या कसून चौकशी केली जात असून काही माहिती पुढे येण्याचे संकेत आहेत. मुंब्रा परिसरातील एका शिक्षकाच्या घरी छापा टाकून शोधमोहीम राबवण्यात आली. पुण्यात एटीएसने ताब्यात घेतलेल्या काही आरोपींच्या चौकशीदरम्यान एका आरोपीने मुंब्रा येथील रहिवासी असलेल्या शिक्षकाशी ओळखीचा दावा केला. एटीएस पथकाने मुंब्रा येथील कौसा विभागात असलेल्या शिक्षकाच्या निवासस्थानी छापा टाकला. यादरम्यान पान २ वर

## जगभरातून पाहण्यासाठी लोकांची गर्दी | मलवडी गाव आले जगाच्या नकाशावर

# राधा म्हशीची गिनीज बुकात नोंद




**। सातारा । प्रतिनिधी ।**

भारतातील अनेक गोष्टींचा जगाला हेवा वाटत असतो. येथील लेण्या, किल्ले, सरोवरांपासून ते जंगल, डोंगराळ रांगाही जगाच्या आकर्षणाचं केंद्र आहे. भारतात असंख्य अशा अद्भूत गोष्टी आहेत. त्यामुळे जगातील पर्यटक भारताकडे आकर्षित होतात. त्यात आता एका म्हशीची भर पडली आहे. या म्हशीची जगाने दखल घेतलीय. साताऱ्याच्या या म्हशीची थेट गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. त्यामुळे ही म्हैस पाहण्यासाठी देशभरातूनच नव्हे तर जगभरातून लोक येत आहेत.

या म्हशीचं नाव राधा आहे. ही म्हैस जगातील सर्वात लहान म्हैस आहे. त्यामुळे तिला बुटकी राधा म्हणूनही साताऱ्यात ओळखलं जातं. सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील मलवडीची ही बुटकी राधा म्हैस आहे. तिची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झालीय. या ठेंगण्या राधाला पाहण्याची सर्वांनाच उत्सुकता लागली असून प्रत्येक प्रदर्शनात ती सर्वांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. मलवडीतील शेतकरी आणि पशुपालक त्रिंबक बोराटे आणि त्यांचा मुलगा अनिकेत बोराटे यांच्या घरच्याच म्हैशीने १९ जून २०२२ रोजी राधाला जन्म दिला. पान २ वर

### अन् गिनीज बुकात गेली

२४ जानेवारी २०२५ रोजी राधाची इंडिया बुक ऑफ रेकॉर्डसमध्ये नोंद झाली. परभणी येथील कृषी प्रदर्शनानंतर अनिकेत याने राधाच्या गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसाठी प्रयत्न सुरू केले. १२ सप्टेंबर २०२५ ला राधाची पाहणी करुन अहवाल पाठवला. २० सप्टेंबरला कागदपत्रे सादर केली. राधाची जगातील सर्वात बुटकी म्हैस म्हणून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झाली. यामुळे यानंतर राधाचे म्हशीचे मालक यांच्यावर कौतुकांचा वर्ष होताना पाहायला मिळत आहे.

## ऑस्ट्रेलियन महिलेचे पुण्यात ब्रेनडेड

**। पुणे । प्रतिनिधी ।**

मूळची लोणावळा येथील पण ऑस्ट्रेलियाची नागरिक असलेल्या ४६ वर्षीय महिलेच्या अवयवदानातून चार गंभीर रुग्णांना अवयव मिळाले. पुणे विभागात पहिल्यांदाच परदेशी नागरिकाने अवयवदान केले आहे. गेल्या काही वर्षांपासून महिला आणि त्यांचे कुटुंब ऑस्ट्रेलियातील मेलबर्न येथे राहत होते. दिवाळी साजरी करण्यासाठी त्यांचे कुटुंब लोणावळा येथे आले होते. या कालावधीत या महिलेला अचानक डोकेदुखीचा त्रास झाल्याने उपचारांसाठी चिंचवड येथील आदित्य बिर्ला रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान महिलेला मेंदूमृत (ब्रेन डेड) घोषीत करण्यात आले.

## राष्ट्रवादी आमदार अपात्रता प्रकरण

# २१ जानेवारीला होणार सुनावणी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

अजित पवार यांनी दोन वर्षांपूर्वी राष्ट्रवादीचे बहुतांशी आमदार सोबत घेत शरद पवारांची साथ सोडली होती. अजित पवार हे शिंदे फडणवीस सरकारमध्ये सामील झाले होते. त्यानंतर हे प्रकरण कोर्टात गेले, पक्षाच्या नावावर आणि चिन्हावर दोन्ही पक्षांनी दावा केला होता. काही काळानंतर कोर्टाने नाव आणि पक्षचिन्ह अजित पवारांच्या गटाला दिले होते. मात्र आमदार अपात्रतेचे प्रकरण अजूनही कोर्टात आहे. आज या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात पार पडली.

सुनावणीच्या सुरुवातील शरद पवारांचे वकील कपिल सिब्बल यांनी मला सुनावणीसाठी २ तास लागतील अशी माहिती दिली. यावर कोर्टाने तुम्ही सुरुवातीला कोणत्या प्रकरणाचा युक्तिवाद करणार आहेत अशी विचारणा केली. त्यानंतर वकिलांनी जानेवारीच्या दुसऱ्या आठड्यात सुनावणी घेण्याची मागणी केली. त्यानंतर आता २१ जानेवारीला या प्रकरणाची सुनावणी होणार आहे.

राष्ट्रवादी आमदार अपात्रता प्रकरणाची आता २१ जानेवारीला सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडणार आहे. त्यावेळी अजिप पवारांचे वकील पक्षातून बाहेप पडलेले आमदार अपात्र कसे नाहीत याबाबत युक्तीवाद करणार आहेत. तर शरद पवारांच्या वतीने पक्ष सोडताना या आमदारांनी नियमांचे उल्लंघन केले आणि त्यामुळे त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई करण्यात यावी याबाबत मागणी करणार आहेत.

# उरणमध्ये बेकायदा यार्ड

## •दरमहा कोट्यवधींची उलाढाल, सिडकोचा कारवाईचा इशारा

। पनवेल । प्रतिनिधी ।

जेएनपीए आंतरराष्ट्रीय बंदरातून ये-जा होणाऱ्या कंटेनर यार्डसाठी बेकायदा यार्ड उभारून दरमहा कोट्यवधींची उलाढाल होत आहे. मात्र नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोची परवानगी घेण्यात आली नाही. याच परिसरात सिडकोचा लॉजिस्टिक पार्कचा प्रस्ताव असताना बेकायदा कंटेनर यार्डकडे दुर्लक्ष केले जात आहे.

उरण तालुक्यात असलेल्या जेएनपीए बंदरातून दरवर्षी लाखो कंटेनरची उलाढाल होते. जगभरातून ये-जा करणाऱ्या कंटेनरला गोदाम आणि कंटेनर यार्डची गरज असते. नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोने कंटेनर यार्डसाठी लॉजिस्टिक पार्कची उभारणी करणे गरजेचे होते. परंतु अद्याप याची उभारणी झालेली नाही. याचा गैरफायदा घेऊन उरणच्या चिर्ले, वेश्वी, जासई ग्रामपंचायत हद्दीत बेकायदा गोदाम आणि कंटेनर यार्ड उभारली आहेत. सिडकोची परवानगी न घेता शिपिंग कंपन्या दरमहा लाखो रुपयांचे भाडे जमा करत आहेत. सुरुवातीला स्थानिक शेतकऱ्यांच्या मालकीची जमीन शेतकऱ्यांकडून विकत घेऊन वेगवेगळ्या कंपन्यांनीच कंटेनर यार्ड उभी केली आहेत. सिडकोने ८ नोव्हेंबरला नवी मुंबईतील विभागवार बेकायदा बांधकामांची यादी प्रसिद्ध केली आहे. यामध्ये सर्वाधिक संख्या उरणमधील कंटेनर यार्डची आहे. उरण तालुक्यातील चिर्ले ग्रामपंचायत हद्दीतील गावठाण, जांभूळपाडा वेश्वी ग्रामपंचायतीतील बेलोंडेखार आदी गावांमध्ये कंपन्यांची सुमारे २२ कंटेनर यार्ड आहेत. कंटेनर यार्डसाठी जमिनीवर भराव टाकून सपाट भूभाग तयार केले आहेत.

### वहाळमध्ये बेकायदा आरएमसी प्रकल्प

आर. के. पाटील इन्फ्रा प्रा. लिमिटेड कंपनीचा वहाळ ग्रामपंचायत हद्दीत पुष्पक नोड येथे आरएमसी प्रकल्प, क्रशर, मिक्सर, मशीन पूर्ण बांधकाम बेकायदा असल्याचे सिडकोने जाहीर केले आहे. राजकीय वरदहस्तामुळे यावर वर्षांनुवर्षे कारवाई केली जात नाही. त्यामुळे आता सिडको प्रशासन काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ट्रेलरचालकाची हाईटगेजला धडक

**पनवेल :** पनवेल-जेएनपीटी हायवे रोडवर ट्रेलरचालकाने निष्काळजीपणाने ट्रेलर चालवुन रोडवर असलेल्या हाईटगेजला ठोकर दिली. याघटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. ट्रेलरचालक विनोदकुमार यादव याने त्याच्या ताब्यातील ट्रेलर रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करून बेदरकारपणे, निष्काळजीपणाने चालवुन रोडवर असलेल्या हाईटगेजला ठोकर दिली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात ट्रेलरचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पुढील तपास पोलीस हवालदार जितीन खरात करत आहेत.

## शाळा, मॉल पत्त्यावर बोगस मतदारांची नावे

### मनसेचा आरोप

। पनवेल । वार्ताहर ।

खारघरमधील मतदारांची नावे खाजगी शाळा, रुग्णालय आणि मॉल या पत्यावर नोंदणी झाल्याचे दिसून येत असून, सदर सर्व मतदार बोगस मतदार असल्याचा आरोप मनसे खारघर पदाधिकारी गणेश बनकर यांनी केला आहे.

खारघर परिसरातील काही मतदारांच्या नावासमोर फोटो नसल्याचे, घर अथवा सोसायटीचा पत्ता नसल्याचे तसेच एका सोसायटीच्या नावाखाली दुसऱ्या सोसायटीमधील मतदारांची नावे असल्याचे काँग्रेस कार्यकर्त्यांच्या पडताळणीत समोर आले होते.

गणेश बनकर यांनी केलेल्या पडताळणीत खारघरमधील संजीवनी स्कूल, लिटिल वर्ल्ड मॉल, आरोग्य रुग्वालय आणि काही सोसायटींच्या पत्त्यावर बोगस मतदारांची नावे नोंदविण्यात आल्याचे उघड झाले आहे.

मतदार यादीत बोगस नावे टाकणाऱ्यांचे मोठे रकेट असून, निवडणूक आयोगाने वेळीच संजीवनी स्कूल, लिटिल वर्ल्ड मॉल, आरोग्य रुग्णालय आणि काही सोसायटींच्या पत्त्यावर नोंदविण्यात आलेली बोगस मतदारांची नावे मतदार यादीतून वगळावीत, अशी मागणी गणेश बनकर यांनी केली आहे.

**PUBLIC NOTICE OF NAME CHANGE**

I, DEEPIKA DATTATRAYA NAIK, daughter of DATTATRAYA MAHADEV NAIK and W/o. AMIT BALKRUSHNA MHATRE, aged 38 years, residing at 929, Sondepar, Choul, Raigad, Maharashtra- 402 203, have changed my name from DEEPIKA DATTATRAYA NAIK to Mrs. JANHVI AMIT MHATRE (W/O AMIT BALKRUSHNA MHATRE).

This change is made consequent to my marriage to AMIT BALKRUSHNA MHATRE on 22/05/2010 at Choul, Golbadevi Temple., Tal Alibag, Dist Raigad, vide marriage certificate number 30676 on dated 22/10/2013.

This is a true and correct declaration made voluntarily.
Publication details:
Affidavit Number: [..42..]
Date of Affidavit: [12/11/2025]
Issued before: Notary Public
Signature: [.sd/-...]
**Mrs. JANHVI AMIT MHATRE**

## पान १ वरून

### सांबरकुंडचा मार्ग मोकळा

बांधकामासाठी जवळपास २ हजार कोटींचा खर्च अपेक्षित आहे. प्रकल्पासाठी जांभूळवाडी, खैरवाडी, सांबरकुंडवाडी येथील १०३ हेक्टर जागेचे भूसंपादन करण्यात आले आहे. धरणाची लांबी ७३० मीटर असून उंटी ३८.७८ मीटर असणार आहे. ज्यात ४९.८५ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा केला जाणार आहे. प्रकल्पामुळे ४ हजार ३१४ हेक्टर जमिनी सिंचनाखाली येणार असून, २४ गावांना पाणी पुरवठा केला जाणार आहे. दोन कालव्यांची कामेही हाती घेतली जाणार आहे.

विस्थापित कुटूंबांचे रामराज येथील राजेवाडी येथे पुनर्वसन केले जाणार आहे. यासाठी १६ हेक्टर भुखंड उपलब्ध करून देण्यात आला असून त्यावर सुमारे तीनशे घरे बांधून दिली जाणार आहेत. या प्रकल्पासाठी संपादीत होणाऱ्या जागेच्या भूसंपादनासाठीचा २०१३ साली निवाडा प्रसिध्द झाला होता. मात्र वाढीव मोबदला मिळावा अशी मागणी प्रकल्पबाधितांनी केली होती. त्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे.

### कर्जमाफी करा

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष मनीष पाटील, अधिकारी सुशील राऊत, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष ॲड. प्रमोद जाधव, जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष भाऊसाहेब पवार, आकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कर्ज व्यवस्थापक भगवान पारधी, कर्ज विभागाचे वरिष्ठ निरीक्षक लक्ष्मीकांत राऊत आदी अध्यक्ष, उपाध्यक्ष व अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जयंत पाटील म्हणाले की, बच्चू कडू यांनी नागपूरला शेतकऱ्यांचे आंदोलन केले होते. त्या आंदोलनाची दखल घेत शासनाने बैठक घेतली. यशस्वी अशी बोलणी झाली. ३० जुन अंतिम तारीख देऊन कर्जमाफी देऊ असे शासनाने सांगितले. १९७३ सालापासून टप्प्याटप्याने कर्जमाफी होत गेल्या. परंतू मध्यवर्ती बँकाची असलेली अडचण आणि कर्जमाफीनंतर असलेल्या समस्या याचा अभ्यास केला नाही. अजूनही काही माफी आली नाही. त्यामुळे आज कर्जामाफीबाबत राज्यातील जिल्हा बँकेच्या प्रमुख मंडळीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. राज्याच्या सहकार चळवळीबरोबरच मध्यवर्ती बँकेमध्ये पहिल्यांदा ही बैठक होत आहे. बच्चू कडूंचे यामध्ये मोलाचे योगदान आहे. कर्जमाफी देताना दोष होऊ नये, यासाठी बैठकाच्या माध्यतून भूमिका घेतली आहे. राज्य शासनासाठी पुरक असे धोरण तयार होईल. टिका होणार नाही. तसेच लवकरात लवकरच शेतकऱ्यांपर्यंत कर्जमाफी पोहचेल याबाबत चर्चा करण्यात आली आहे. कर्जमाफीनंतर अपूरेपणा राहतो. त्यामध्ये वेगवेगळ्या गोष्टी गैर होतात. त्याबाबत ही बैठक घेण्यात आली आहे. पुढल्या आठवड्यात बैठक घेऊन एक धोरण ठरविले जाईल, असे जयंत पाटील यांनी सांगितले.

### मिनीडोअर चालक-मालक आक्रमक

काढण्यात येईल असा इशारा रायगड जिल्हा विक्रम मिनीडोअर चालक व मालक संघाच्या वतीने विजय पाटील यांनी दिला.

रायगड जिल्ह्यामध्ये विक्रम, मिनीडोअरसह टॅक्सीची संख्या साडेतीन हजार आहे. या व्यवसायातून स्थानिक मंडळी आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवित आहेत. अनेकांनी कर्ज काढून गाड्या घेतल्या आहेत. कर्जाचे हप्ते या व्यवसायातून फेडण्याचे काम चालक व मालक करीत आहेत.

मात्र जिल्ह्यातील विक्रम, मिनीडोअरची वयोमर्यादा संपुष्टात आल्यावर शासन निर्णयानुसार, ती वाहने स्क्रॅप केली जाणार आहेत. त्यामुळे चालक व मालकांची परवाने रद्द केली जातील. चालक व मालकांवर मोठे आर्थिक संकट निर्माण होईल. ही समस्या सोडविण्यासाठी संघटनेचे अध्यक्ष विजय पाटील यांनी आत्मदहन करण्याचा प्रय़त्न केला होता. आंदोलनाचे गांभीर्य ओळखून तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठक लावून प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते. त्याची कार्यवाही करण्याचे आदेशही संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले होते. विशिष्ट कालावधीत अंमलबजावणी करण्याचे सांगण्यात आले होते. मात्र दोन वर्षे उलटूनही त्याची कार्यवाही झाली नाही. मात्र समस्या सोडविण्यास संबंधित विभागाचे अधिकारी जाणुनबुजून दिरंगाई करीत आहेत, असा आरोप करण्यात आला आहे. शासनाचे पुन्हा लक्ष वेधण्यासाठी विजय पाटील यांच्या नेतृत्वाखाली मिनीडोअर चालक मालक संघटनेचे काही पदाधिकारी यांनी निवासी उपजिल्हाधिकारी यांची भेट घेतली.

इको टॅक्सी वाहन पासिंगच्यावेळी जीपीएस सक्ती करण्यात आली. यासाठी १२ हजारहून अधिक रक्कम मोजावी लागली. मात्र यावर्षी वाहन पासिंगसाठी जीपीएसला ग्राह्य धरले जात नाही. त्यामुळे परिवहन विभागातील अधिकाऱ्यांनी फसवणूक केल्याचा आरोप होत आहे. ही बाब निदर्शनास आणून दिली. प्रलंबित मागण्यांची दखल न घेतल्यास १९ नोव्हेंबरला तीव्र आंदोलन केले जाईल अशा इशारा यावेळी निवेदनातून देण्यात आला. यावेळी जिल्हा अध्यक्ष विजय पाटील, प्रमोद पाटील व जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते.

### सेवावर्गच्या नावाखाली लाखोंचा बाजार?

समोर आली आहे. मात्र, बदली झालेल्या काही तलाठ्यांना पुन्हा सेवावर्गच्या नावाखाली अलिबागमध्ये बोलावण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यासाठी लाखोंचा घोडेबाजार झाल्याची चर्चा महसूल विभागात सुरु आहे. सेवावर्गच्या नावाखाली अलिबागमध्ये पुन्हा आलेल्या तलाठ्यांना मर्जीतील सजा देण्यात आले आहे. यातील काहींकडून पाच-पाच लाख घेतल्याची चर्चा महसूल विभागात आहे. यापूर्वीही बोली एक लाख होती. आता पाच पटीने बोली वाढली असल्याचे बोलले जात आहे. खालापूर, पेण, कर्जत तालुक्यात बदली झालेल्या तलाठ्यांना पुन्हा अलिबागमध्ये सेवावर्गच्या नावाखाली आणण्यात आले आहे. त्यानंतर त्यांना त्यांच्या मर्जीतील सजा देण्यात आले असल्याची चर्चा जोरात सुरु आहे. जिल्ह्यातील अलिबागसह पनवेल, उरण, या तालुक्यात हा कारभार सुरू असल्याचे बोलले जात आहे. ज्यांना खऱ्या अर्थाने सेवावर्गची गरज आहे, त्यांना मात्र फारसा महसूल विभागाकडून प्रतिसाद दिला जात नसल्याची चर्चा आहे. त्यामुळे हा प्रकार आटोक्यात आणण्यास रायगडचे जिल्हाधिकारी यशस्वी ठरतील का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### थेट मुंब्रातील शिक्षक ताब्यात

बराचवेळी शोध मोहिमही राबवण्यात आली. एटीएसकडून लॅपटॉप, मोबाईल फोन आणि इतर संगणक उपकरणे जप्त करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, मुंब्रा येथील त्याच्या निवासस्थानाची झडती घेतल्यानंतर, एटीएस पथकाने शिक्षकाला मुंबईतील कुर्ला परिसरातील त्याच्या दुसऱ्या निवासस्थानी नेले, तिथेही शोध घेतला. पुण्यातून एटीएसने ताब्यात घेतलेल्या आरोपींचा आणि या शिक्षकाचा थेट संबंध काही नाही ना? याचा शोध पोलिसांकडून घेतला जात आहे. ठाणे जिल्ह्यात महाराष्ट्र एटीएसने कारवाई केल्याने खळबळ उडाली आहे.

राजधानी दिल्लीत झालेल्या स्फोटानंतर देशभरात अलर्ट जारी आहे. त्यामध्येच एटीएसकडून मोठी कारवाई मुंब्रामध्ये केल्याने खळबळ उडाली आहे. एटीएसकडून चौकशी केली जात आहे. दिल्ली स्फोटात थेट काही डॉक्टरांची नावे पुढे आली असून काहींना अटकही करण्यात आली. उमर याच्यासोबत या स्फोटात काही डॉक्टरांची नावे पुढे आल्यानंतर एटीएसकडून आता चाकशीसाठी थेट मुंब्र्यातील शिक्षकाला ताब्यात घेण्यात आलंय.

महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाची मुंब्रा कौसा ज्या शिक्षकाच्या घरी छापेमारी केली त्याचं नाव इब्राहिम आबिदी आहे. इब्राहिम आबिदी हा मुंब्रा कौसा येथे भाड्याने रहात असल्याची माहिती. आबिदी हा दर रविवारी कुर्लाच्या एका मस्जिदमध्ये उर्दु शिकवण्यासाठी जात होता. कुर्लामध्ये त्याची दुसरी पत्नी राहत असून तिच्या घरीही ने छापेमारी केली. या घरातून इलेक्ट्रॉनिक वस्तू जप्त केल्या असून या साहित्यांचे ॲनालिसिस केले जाणार आहे. पुण्यातील अल-कायदा या दहशतवादी संघटनेचे साहित्य बाळगल्याच्या आरोपावरून एका सॉफ्टवेअर इंजिनिअरला पुण्यातून अटक केली होती. याच प्रकरणी आता महाराष्ट्र एटीएसने मुंब्रा भागात छापेमारी केली आहे. अल कायदा इन इंडियन सबकाँटिनेन्ट (एक्यूआयएस) या दहशतवादी संघटनेच्या समर्थनार्थ जिहादचा प्रसार-प्रचार करून देशाच्या एकता व सुरक्षिततेला धोका निर्माण केल्याच्या आरोपावरून जुबेर इलियास हंगरगेकर याला अटक केली होती.

### राधा म्हशीची गिनीज बुकात नोंद

पण तिची उंचीच वाढत नसल्याने सर्वांच्या आकर्षणाची ती केंद्र झाली आहे.

राधा दोन-अडीच वर्षाची झाल्यावर तिच्या उंचीतला बदल त्रिंबक बोराटे यांच्या लक्षात आला. त्यानंतर बोराटे यांचा कृषी पदवीधर मुलगा अनिकेत याने राधाला कृषी प्रदर्शनात सहभागी करण्याचा निर्णय घेतला. मात्र सुरुवातीला कोणीच त्याला प्रतिसाद दिला नाही. २१ डिसेंबर २०२४ सोलापूर येथील सिध्देश्वर कृषी प्रदर्शनात पहिल्यांदा राधाने सहभाग घेतला. अन् राधाचा सर्वत्र बोलबाला सुरू झाला. त्यानंतर पुसेगावचे सेवागिरी कृषी प्रदर्शन आणि कर्नाटकातील निपाणी येथील कृषी प्रदर्शनासह एकूण १३ कृषी प्रदर्शनात भाग घेतला. या प्रदर्शनांमध्ये खास आकर्षण म्हणून राधाला निमंत्रित करण्यात आले होते.

## नंदकुमार मरवडे यांना ‘आदर्श शिक्षकरत्न’ पुरस्कार



। कोलाड । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील श्री. क्षेत्र तळवली तर्फे अष्टमी या गावचे सुपुत्र व श्रमिक विद्यालय चिल्हे येथे शिक्षकी सेवेत कार्यरत असणारे नंदकुमार विठोबा मरवडे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षकरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

राज्यातील सामाजिक क्षेत्रात गेली अनेक वर्षे कार्य करणाऱ्या शिव प्रतिष्ठान पुणे या सामाजिक संस्थेच्या वतीने आळंदी येथे आयोजित करण्यात आलेल्या एका शानदार कार्यक्रमात मराठी सिनेतारका प्रतिक्षा जाधव, शिव प्रतिष्ठान पुणे संस्थेचे संस्थापक अध्यक्षमदन रेडगडे पाटील, सुप्रसिद्ध व जागतिक विक्रमवीर बाल गिर्यारोहक अन्वी घाटगे, आय.ए.एस. आणि महाराष्ट्र राज्य पशु कल्याण आयुक्त डॉ.हेमंत वसेकर, सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा कुऱ्हाडे आदी मान्यवरांचे हस्ते नंदकुमार मरवडे यांचा सन्मानचिन्ह, पत्र, पुष्पगुच्छ, शाल,श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला आहे.

गेली ३० वर्षे शिक्षण सेवेत कार्यरत राहून शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे योगदान व अनेक क्षेत्रात अग्रेसर राहून सक्रिय पुढाकार घेऊन केलेले कार्य याची दखल घेऊन पुणे येथील शिव प्रतिष्ठान या संस्थेने त्यांना सन्मानित केले आहे. त्यांच्या या सुयशाबद्दल संस्थेचे चेअरमन महेंद्र पोटफोडे व सर्व पदाधिकारी तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक,सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग व तळवली ग्रामस्थ तसेच रोहा तालुका कुणबी समाज शाखेचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी त्यांचे अभिनंदन व्यक्त करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## दुकानाचे शटर उचकटून रोकड लंपास

**पनवेल :** हॉटेलच्या दुकानाचे शटर उचकटून अज्ञात चोरट्याने गल्ल्यातील ७० हजार रुपये चोरून नेले. या प्रकरणी खांदेश्वर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लवेश सोनवणे यांचे कॅफे लविस्ता हॉटेल आहे. कामगार हॉटेल उघडण्यासाठी आला असता, त्याला शटर उचकटले असल्याचे दिसून आले. यावेळी सोनवणे यांनी हॉटेलमध्ये पाहिले असता, गल्ल्यातील ७० हजार रूपयांची रोकड लंपास असल्याची बाबत उघडकीस आली.

## हॉकी स्टिकने एकाला मारहाण

। पनवेल । वार्ताहर

फिर्यादी जुम्मन हनिफ खान यांना काही व्यक्तींनी हॉकी स्टिक व चाकूने मारहाण केल्याची घटना पनवेल तालुक्यगतील उसर्ली येथे घडली आहे. फिर्यादी जुम्मन हनिफ खान हे उसर्ली येथे त्यांच्या राहत्या घरी असताना ४ इसम त्यांच्या घरी आले व त्यांनी त्यांच्याशी भांडण काढून त्यापैकी एकाने हॉकीस्टीकने फिर्यादी यांच्या डोक्यात मारून व दुसऱ्या एकाने त्याच्याकडे असणाऱ्या चाकुने फिर्यादी यांना डाव्या हाताला मारून दुखापत केली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पनवेल शहर पोलीस गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

**पनवेल महानगरपालिका**
**जाहिर ई-निविदा सुचना**
**कालावधी- ३ वर्ष**

सन २०२५-२०२६, सन २०२६-२०२७ व सन २०२७-२०२८ या ३ वर्षाकरिता पनवेल महानगरपालिका हद्दितील विविध उद्यानांतील लॉनची कापणी करणेकामी लॉन मूवर, ग्रास कटर व वुड कटर इ. साहित्य पुरविणेकामी जाहिर ई निविदा प्रसिद्ध करून दर निश्चित करणेकामी अंदाजपत्रक तयार करणेबाबत या कामासंबंधीचा सविस्तर तपशील www.panvelcorporation.com या संकेत स्थळावर व भांडार विभागात उपलब्ध आहे.

सही/-
**(अभिषेक पराडकर)**
**उपायुक्त (भांडार)**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.:पमपा/भांडार/३६२५/प्र.क्र./९६३/२०२५
दिनांक : १२/११/२०२५

**जाहीर नोटीस**

सर्व संबंधितांस ह्या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक प्रफुल्लता गंगाधर नवाले व प्रतिभा गंगाधर नवाले यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहीत असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र.व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार (रू.पै.) | भूधारणा पद्धती |
|---|---|---|---|---|
| चेंढरे ता.अलिबाग जि. रायगड | ५२/५/ब | जिरायत ०-०५-३० पो.ख. ०-०१-०० एकूण क्षेत्र ०-०६-३० | ०.३१ | भोगवटादार वर्ग २ |

अलिबाग
दि. १२/११/२०२५

सही/-
**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
ENROLLMENT No. MAH/5773/2006
Rituraj Plaza, Ground Floor,
Flat No. 1. Ch. Shivaji Chouk
Near Gawade Optics
Alibag-Raigad

फोन नं.- २४५५३५

**ग्रुप ग्रामपंचायत नागांव**
मु. पो. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड, पिन-४०२ २०४

जावक क्र. - १६६३
दिनांक - ०७/११/२०२५

**जाहीर नोटीस**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ व कर व फी (शुल्क) १९६० नुसार खालील मालमत्तेच्या नावे संबंधाने ग्रुप ग्रामपंचायत नागांव कडे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या परत्वे १६ अ मधील नियमाप्रमाणे सदर संदर्भाने कोणत्याही हित संबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हित संबंधांच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रुप ग्रामपंचायत नागांवकडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

| अ.क्र. | गावाचे नाव | घर क्र. | असेसमेंट दप्तरी असलेल्या घर मालकाचे नाव | नवीन नोंद करावयाचे घर मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | नागांव | १४७ | दिपक वासुदेव जाधव | निलेश वसंत म्हात्रे वगैरे ३ |
| २ | | १६०२अ,ब,क | दिपक वासुदेव जाधव | निलेश वसंत म्हात्रे वगैरे ३ |
| ३ | | १४२ | विजय यशवंत केळकर वगैरे एक | दिपाली हेमचंद्र पाटील वगैरे ३ |
| ४ | | १६७ | विजयकुमार रिकाबचंद कानुंगा | मीनाक्षी श्रीकांत नाईक |
| ५ | | ६६८ अ | कै. मधुकर रामचंद्र पाटील | जयश्री जयवंत पाटील |
| ६ | | ८३० | कै. वसंत गणपत शेवडे | संजय वसंत शेवडे |
| ७ | | २६४१ | कै. विनय जयवंत वैद्य | उज्वला प्रभाकर शिर्के |
| ८ | | २५८९ | वर्षा प्रशांत कारभारी | हेमंत पुरुषोत्तम पेटारे वगैरे एक |
| ९ | | ४३३ | मधुकर यशवंत सोहोनी | अनिरुद्ध मधुकर सोहोनी |
| १० | | | श्रीकृष्ण आत्माराम प्रधान | रमेश ल. भिलारे वगैरे एक |

सही/-
**सौ. हर्षा निखिल मयेकर**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत नागांव**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे कान्हीवली, ता. सुधागड, जि. रायगड येथील जमीन मिळकत**
**मिळकतीचे वर्णन**

| जमीन मालकांची नावे | स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री. राजेंद्र नथु देशमुख | ९/१ | ०-८८-५० पैकी ०-२०-०० | १०-६२ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.
दिनांक - १३/११/२०२५

खरेदीदारांतर्फे
राठोड ॲण्ड असोसिएट्स
२८६ अ राठोड सदन ऑफिस नं. ७
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. प्रमोद हसुराम तांडेल, रा. घर नं. ९७०, खारघर गाव, ग्रीन फिंगर ग्लोबल शाळे समोर, सेक्टर १३, खारघर, ४१०२१०., यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे शिलार, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| २०/१ | ०.०१.५० | ०.०९ | श्री. किरण हरि बागड, वैगेरे. |
| २१/३ | ०.२५.०० पो.ख.०.०२.०० | ०.२७ | श्री. किरण हरि बागड, वैगेरे. |
| २१/६ | ०.०४.०० | ०.०५ | श्री. किरण हरि बागड, वैगेरे. |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १३/११/२०२५.

सही / -
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे .
मो.नं.७३८५००४८०६.

**जाहीर नोटीस**

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली सदनिका मिळकत तिचे मालक सौ. चैताली मंगेश घोलप यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या सदनिका मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे दहिवली तर्फे निड, ता. कर्जत, जि.रायगड येथील**

**सिटी सर्व्हे नं. ५०९ यावर बांधण्यात आलेली ‘श्रीधर गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित; या इमारतीमधील बी विंग, दुसऱ्या मजल्यावरील सदनिका नं.- २०४, क्षेत्र ३९६ चौ. फूट. बिल्टअप (कर्जत नगरपरिषद जुना मालमत्ता क्र. १०५१/१६, नवीन मालमत्ता क्र. Z2002287)**

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा बयाना, कूळमूखत्यारपत्र, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर सदनिका मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल अंतिम सेल डिडचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. १३/११/२०२५

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण, निर्माण नगरी,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे- गुंडगे, ता. कर्जत, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमाच्या खुद्द मालकीची मिळकत असून, आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**-: जमीन मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे गुंडगे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे नं./हिस्सा नं./ प्लॉट नं. | सिटी सर्व्हे नं | क्षेत्रफळ आर.चौ.मी. |
|---|---|---|---|
| श्री. दिपक बुधाजी भालेराव | १७/१/अ/३/अ/२/अ | ३३२ | ८५६ यापैकी भोगवटाधारक यांचे क्षेत्र ४२८ चौ.मी. |

वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुद्धा.

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण - दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कबजा, एम.ओ. यु., हुकूमनामा, मनाई आदेश जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन, रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क- हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालक श्री. दिपक बुधाजी भालेराव यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन ना हरकत दाखला देण्यात येईल व सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे,

कर्जत
दिनांक : ११/११/२०२५

सही/-
**ॲडव्होकेट. मिनाक्षी जगन्नाथ भासे**
पत्ता शॉप नं. १६, श्री नेमीनाथ हाईटस्, मुद्रे (बुद्रुक), ता. कर्जत, जि. रायगड ४१० २०१.
मो.नं. ७४१०१४८१२१/७७९८१५११८८

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# निवडक

## उरणमधील राजकीय मैदान शांत

**उरण :** उरण नगरपालिकेच्या निवडणुकीचे रणशिंग वाजले असले तरी राजकीय मैदान मात्र अद्यापही शांत आहे. अर्ज दाखल करण्याचा तिसरा दिवस उलटला, तरी एकही उमेदवारी अर्ज दाखल झाला नाही, अशी माहिती निवडणूक प्रशासनाकडून मिळाली आहे. उरण नगरपरिषदेची निवडणूक अनेक वर्षांनी होत असून, सोमवार दि. १० नोव्हेंबरपासून अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र, तीन दिवस उलटूनही एकही अर्ज न आल्याने स्थानिक राजकारणात चक्रावलेपणा निर्माण झाला आहे. तसेच, अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत सोमवार दि.१७ नोव्हेंबरपर्यंत आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, भाजपचे उमेदवार गुरुवारी (दि.१३) अर्ज दाखल करणार असून, महाविकास आघाडी शुक्रवारी (दि.१४) मैदानात उतरणार आहे. परंतु, नगराध्यक्षपदाचा चेहरा अद्याप कोणत्याही गटाकडून जाहीर झालेला नाही. त्यामुळे उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतरच पक्ष आपले मोहरे उघड करतील, अशी चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली आहे. दरम्यान, स्थानिक राजकारणातील गुप्त हालचाली, आंतरकलह आणि संभाव्य बंडखोरीच्या चर्चांनी सध्या वातावरण तापले आहे. पुढील काही दिवसांत या थंड रणांगणात कोण पहिली चाल खेळतो, याकडे उरणकरांचे लक्ष लागले आहे.



## कोकण दिंडीचे बोरघाटात स्वागत

**खोपोली :** संतांनी दिलेला अध्यात्मिक वारसा कोकणात आजही मजबूत आहे. आळंदी येथे माऊलींच्या समाधी दिना निमित्ताने समस्त वैष्णवांचा मेळावा भरणार असून वारकरींच्या आदरतीर्थ्यासाठी खोपोली नगरपालिका, पोलीस प्रशासना सह विविध राजकीय, सामाजीक संस्था, मंडळे आनंदाने समाविष्ट होत आहेत. खालापूर तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यातील वारकरी मागील दोन-तीन दिवसांपासून खोपोलीला मुक्काम करुन आळंदीकडे निघत आहेत. यादरम्यान, खोपोली मुक्कमी आलेल्या सर्वच वारकरी दिंड्याचे माजी नगराध्यक्ष रामदास शेंडे आणि माजी उपनगराध्यक्ष कुलदिपक शेंडे व मित्र परिवाराने बोरघाटात जोरदार स्वागत करीत चहापानाची व्यवस्था केली.

## होरपळलेल्या रमेश कांबळेंचा मृत्यू

**उरण :** उरण शहरात सोमवारी (दि.१०) मध्यरात्री बौद्धवाडा परिसरात एका घराला आग लागल्याची घटना घडली होती. या भीषण आगीत होरपळलेल्या रमेश कांबळे (४२) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. तर, त्यांची पत्नी आणि मुलगी यांची देखील परस्थिती नाजून असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. उरणमधील मासळी मार्केटजवळील बौद्धवाडा परिसरातील रमेश कांबळे यांच्या घराला सोमवारी मध्यरात्री आग लागली. घटनेच्या वेळी तिघेही झोपेत होते. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले आणि संपूर्ण घराला वेढले. रमेश, त्यांची पत्नी आणि मुलगी या तिघांनाही गंभीर भाजल्या अवस्थेत बाहेर काढण्यात आले आणि त्यांना उपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, मंगळवारी (दि.११) सकाळी रमेश कांबळे यांची मृत्यूशी झुंज संपली. त्यांच्या निधनाने बौद्धवाडा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मंगळवारी सायंकाळी उरण येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. रमेश कांबळे यांची पत्नी आणि मुलगी निकिता यांच्या प्रकृतीची स्थिती गंभीर असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## कळंबोली पुलाखाली पाणी गळती



**पनवेल :** मुंबई-पुणे महामार्गावरील कळंबोली पुलाखालील दोन जलवाहिनीतून सतत पाणी गळती होत आहे. आणि त्या पाण्याचा वापर टँकर व्यवसायिक बांधकामासाठी करत असल्याचा आरोप येथील नागरिक करीत आहे. वर्षानुवर्षे सुरू असलेली ही स्थिती प्रशासनाच्या दुर्लक्षाची साक्ष देत असल्याचे बोलले जात आहे. सध्या येथील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. त्यात दिवाळी सारख्या सणात देखील प्रचंड प्रमाणात पनवेलकरांना पाणी टंचाईचा सामना करावा लागला. त्यासाठी सिडकोवर आक्रोश मोर्चा देखील काढण्यात आला होता. त्यामुळे अशा गळती शोधून त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढणे अत्यावश्यक असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे.

# रस्ता रुंदीकरणासाठी खोट्या सह्यांचा अर्ज

## ।। रहिवाशांची थेट नगरपरिषदेत धडक ।। नव्याने अर्ज सादर

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

**कर्जत नगरपरिषद हद्दीतील विठ्ठल नगर परिसरात अंतर्गत रस्ता रुंदीकरणाच्या प्रस्तावावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. या भागातील सुमारे ५८ रहिवाशांनी नगरपरिषदेकडे निवेदन सादर करत या प्रस्तावाला कडाडून विरोध नोंदवला असून, या प्रकरणात खोट्या सह्या घेऊन दिशाभूल केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.**




विठ्ठल नगर परिसरातील विद्यमान ६ मीटरचा रस्ता ९ मीटर करण्यात यावा, असा अर्ज नगरपरिषदेकडे काही दिवसांपूर्वी करण्यात आला होता. या अर्जाबाबत रहिवाशांनी माहिती अधिकारातून प्रत मळिवली असता आश्चर्याचा धक्का बसला. कारण, या अर्जावरील अनेक स्वाक्षऱ्या आपल्या नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. आम्ही असा कोणताही अर्ज दिला नाही, तसेच कोणत्याही रुंदीकरणास सहमती दर्शविली नाही, असे स्पष्ट करत या अर्जामागे स्वार्थी हेतू असल्याचा दावा रहिवाशांनी केला आहे. विठ्ठल नगर परिसरातील रस्ता हा फक्त अंतर्गत रस्ता असून पुढे कृषी संशोधन केंद्राची जागा आणि गटार असल्याने हा रस्ता 'डेड एंड' वर जातो. दुसऱ्या बाजूसही सत्यम अपार्टमेंटजवळ रस्ता संपतो. त्यामुळे वाहतुकीचा मोठा प्रश्न येथे निर्माण होत नसल्याचे रहिवाशांचे म्हणणे आहे. अशा परिस्थितीत ९ मीटर रस्त्याची गरजच काय? असा सवाल ते उपस्थित करत आहेत. तसेच, या रस्त्यावर वाहने उभी असली तरीही वाहतुकीला फारसा अडथळा येत नाही, असेही त्यांनी नमूद केले आहे.

तसेच, येथील एका विकासकाच्या फायद्यासाठी रहिवाशांच्या खोट्या सह्या करून रस्त्याचे रूंदीकरण केले जात असून त्यात भाजपच्या नेत्याचा हस्तक्षेप असल्याचा आरोप देखील रहिवाशांमधून होत आहे. मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांना रहिवाशांनी दिलेल्या निवेदनात त्यांनी आपल्या हरकतीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून खोट्या अर्जाला मान्यता न देण्याची मागणी केली आहे. नगरपरिषद प्रशासन यावर काय निर्णय घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तसेच, पुढील काही दिवसांत कर्जत नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या तोंडावर हा मुद्दा आणखी तापण्याची शक्यता असल्याचे बोलले जात आहे.

### भाजप नेत्याचा हस्तक्षेप

रहिवाशांचा आरोप आहे की, येथील एका विकासकाला बांधकमासाठी अधिक मजले उभारण्याकरिता अतिरिक्त एफएसआयची आवश्यकता आहे. त्यासाठी रस्ता रुंदीकरणाचा मुद्दा पुढे रेटला जात असून त्याच्याच फायद्यासाठी हा अर्ज खोट्या सह्यांवर आधारित करून नगरपरिषदेत जमा करण्यात आला आहे. या विकासकामध्ये स्थानिक भाजप नेते सुनील गोगटे भागीदार असल्याने या प्रकरणात त्यांचाच हस्तक्षेप असल्याचा स्थानिकांचा आरोप आहे. याबाबत सुनील गोगटे यांच्या सोबत कृषीवल प्रतिनिधीने संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.


> **विकासकाच्या फायद्यासाठी येथील रहिवाशांच्या खोट्या सह्या अर्जावर करण्यात आल्या आहेत. कर्जत नगर परिषदेने यावर कोणतीही कारवाई केली नाही तर वेळप्रसंगी आंदोलन किंवा गुन्हा दाखल करण्याची आमची तयारी आहे.**
> **- राजेंद्र वैशंपायन, रहिवाशी**

# पागोटेजवळ पेट्रोल लाईन फुटली

- **उरण-खारकोपर रेल्वे सेवा ठप्प**
- **सावधगिरी मुळे मोठा अनर्थ टळला**

**। उरण । प्रतिनिधी ।**

धुतूम ग्रामपंचायत हद्दीतील इंडियन ऑईल अदानी व्हेंचर्स लिमिटेड या कंपनीत जेएनपीए बंदरातून जाणारी पेट्रोल-नाफ्ता ही अति ज्वलनशील पाईप लाईन बुधवारी (दि.११) सकाळी फुटल्याची घटना घडली. नागरिक व प्रशासनाच्या प्रसंग सावधगिरीमुळे मोठा अनर्थ टळला आहे. दरम्यान, सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उरण-खारकोपर रेल्वे सेवा बंद केल्याने त्याचा त्रास प्रवासी वर्गाला सहन करावा लागला.



उद्योगपती गौतम अदानी यांच्या ताब्यात असलेल्या इंडियन ऑईल अदानी व्हेंचर्स लिमिटेड या कंपनीत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे वारंवार स्फोटाच्या घटना किंवा जेएनपीए बंदरातून धुतूम ग्रामपंचायत हद्दीतील प्रकल्पात येणाऱ्या पेट्रोल, डिझेल, नाफ्ता या ज्वलनशील पदार्थ वाहून आणणाऱ्या पाईप लाईनला चोरीच्या उद्देशाने ट्याप लावण्याच्या घटना घडत आहेत. बुधवारी (दि.११) सकाळी जेएनपीए महामार्गावारील पागोटे गावाजवळील उड्डाण पूलाजवळ पेट्रोलची पाईप लाईन फुटल्याची बाब काही नागरिकांच्या निदर्शनास आली. त्याची माहिती इंडियन ऑईल अदानी व्हेंचर्स लिमिटेड या प्रकल्पातील अधिकाऱ्यांना मिळताच त्यांच्याकडून प्रसंगावधान बाळगून या फुटलेल्या पाईप लाईनच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले. मात्र, सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उरण-खारकोपर रेल्वे सेवा रेल्वे प्रशासनाने बंद केल्याने त्याचा त्रास प्रवाशांना सहन करावा लागला. त्यानंतर दुपारी साडेतीन वाजता रेल्वे सेवा सुरू करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून सांगण्यात आली.

या घटने संदर्भात इंडियन ऑईल अदानी व्हेंचर्स लिमिटेड प्रकल्पातील अधिकाऱ्यांना विचारणा केली असता त्यांनी बोलण्यास नकार दर्शविला. तर, उरण व नवी मुंबई शहराकडे जाणारी रेल्वे सेवा बंद का करण्यात आली, यासंदर्भात रेल्वे प्रशासनाकडे विचारणा केली असता त्यांनी प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी उरण-खारकोपर रेल्वे सेवा बंद केल्याचे सांगितले.

# रस्त्याला कार्पेटची झालर



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवीन पनवेलमध्ये रस्ते डांबरीकरणाला वेग आला असून हे काम अहोरात्र सुरू आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांसह प्रवासी वर्गात आनंदाचे वातावरण आहे. मात्र, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या भेटीपूर्वी येथील रस्ते झटपट दुरुस्त होत असल्याची चर्चा सध्या नागरिकांमधून होत आहे. परंतु, येथील रस्ता आहे त्याच परिस्थितीत त्यावर फक्त डांबरी कार्पेट टाकून रस्त्याला चमकवले जात आहे. त्यामुळे हा रस्ता किती दिवस टिकेल, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. तसेच, या रस्त्याची गुणवत्ता पाहण्यासाठी पालिका अधिकारी पुढे येतील का, असा सवालही उपस्थित करण्यात येत आहे.

# जेएसडब्लूकडून जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम सुरू

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठण्यातील मोहल्ला व लगतच्या परिसराला पाणीपुरवठा करणाऱ्या जेसडब्लू कंपनीच्या जलवाहिनीला गळती निर्माण झाल्याने गेल्या काही महिन्यांपासून मोहल्ला भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे या भागातील महिला व नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यामुळे जेसडब्लू कंपनीने जलवाहिनीची दुरुस्ती करून उच्च दाबाच्या ११०० मिलिमीटर व्यासाच्या मोठ्या जलवाहिनीतूनच आमचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवावा, अशी मागणी मोहल्ला भागातील नागरिकांनी कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे केली आहे.

नागोठण्यातील नारायण सॉ मिलपासून आझाद मोहल्ला, तक्का मोहल्ला, खान मोहल्ला, मिरानगर या भागासह संपूर्ण मोहल्ला भागाला जेसडब्लू कंपनीच्या जलवाहिनीतून होणारा पाणीपुरवठा कमी दाबाने होत असल्याने नागरिकांना मुबलक पाणी मळित नाही. त्यामुळे नागरिकांच्या तक्रारी नंतर बुधवारी (दि.१२) सकाळी जेसडब्लू कंपनीचे पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी त्यांच्या टीम व यंत्रसामुग्रीसह महामार्गालगतच्या जलवाहिनीच्या ठिकाणी आले. पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी



जेसडब्लू कंपनीकडून बुधवारी सकाळीच दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले असून सध्या ११०० मिलिमीटर व्यासाच्या जलवाहिनीतूनच मोहल्ला भागाला पाणी देण्यात येणार आहे. मात्र, मोहल्ला भागासाठी ४०० मिलिमीटर व्यासाच्या नवीन जलवाहिनीतून पाणीपुरवठा करण्याचा कंपनीचा बेत असल्याचे येथील नागरिकांमधून बोलले जात आहे.

दरम्यान, जेसडब्लू कंपनीच्या पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी जितेंद्र खरसांबळे यांच्याशी कृषीवलच्या प्रतिनिधींनी संपर्क साधला असता, कंपनीने ४०० मिलिमीटरव्यासाच्याजलवाहिनीतून मोहल्ला भागासाठी आधीही काही जोडण्या दिल्या आहेत. सध्या प्रायोगिक तत्वावर ४०० मिलिमीटर व्यासाच्या जलवाहिनीतून नव्याने देण्यात येणाऱ्या जोडणीतून पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास जुन्या ११०० मिलिमीटर व्यासाच्या जलवाहिनीतून पाणीपुरवठा देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# नवीन पनवेलमधील रस्त्यांची दुरवस्था

## ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील नवीन पनवेल येथील रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. सेक्टर एक ते पाचपर्यंत सर्व रस्ते खड्डेमय झाले आहेत. त्याचा नाहक त्रास वाहन चालकांना होत आहे.



नवीन पनवेल शहरातील रस्ते काही महिन्यांपूर्वी बनवले होते. मात्र, पावसाळ्यात या रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. त्यानंतर थोड्याफार प्रमाणात येथील खड्डे बुजवण्यात आले. परंतु, पुन्हा या रस्त्यांवर खड्डे पडल्याने ठेकेदाराच्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. त्यामुळे नविन पनवेल परिसरात महापालिकाच्या भोंगळ कारभाराचा फटका करदात्या नागरिकांना सोसावा लागत आहे. नागरिकांना गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून खड्डेमय रस्त्यातून प्रवास करावा लागत आहे. पालिकेने संबंधित ठेकेदारावर कारवाई करणे अपेक्षित असताना तसे होताना दिसत नाही. रस्त्यावरील डांबर थोड्याच महिन्यात निघून गेल्याने ठेकेदाराने कामात भ्रष्टाचार केला असल्याचे बोलले जात आहे. आदई गावाच्या कमानीजवळील रस्ता देखील खड्ड्यात गेला आहे. आदई सर्कलकडे जाणारा रस्ता खड्डेमय झाला असून त्यामुळे वाहतूक कोंडी होत आहे. संपूर्ण नवीन पनवेल शहरच खड्ड्यात गेल्याने पालिका काय करते, असा सवाल उपस्थित झाला आहे. त्यामुळे संबंधित ठेकेदारावर कारवाई करून लवकरात लवकर खड्डे बुजवावे, अशी मागणी जोर धरत आहे.

## पनवेलमध्ये बिबट्याचे दर्शन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नितलस गावात पुन्हा एकदा बिबट्यांचा वावर दिसून आला आहे. येथील रहिवासी कुणाल काठे यांनी दुपारी श्री मलंगवाडीला जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावर दोन बिबटे पाहिल्याची माहिती दिली. त्यापैकी एक बिबट्या मोठा तर दुसरा लहान होता. या घटनेनंतर ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यापूर्वी देखील या परिसरात अशाच प्रकारे बिबट्यांचा वावर आढळला होता. सध्या मलंगवाडीच्या रस्त्याकडे जाण्यास गावकरी टाळत आहेत.

# रेखा कटके यांची 'गरुड झेप'

**। महाड । प्रतिनिधी ।**

अनंत पांडुरंग भोईर विद्यालय व रघुनाथशेठ जितेकर जुनियर कॉलेजच्या प्राध्यापिका रेखा कटके यांना नुकतेच ईगल फाऊंडेशनच्या राज्यस्तरीय पुरस्काराने सांगलीतील अण्णासाहेब डांगे इंजिनिअरिंग कॉलेज आष्टा येथे सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार सांगलीचे माजी मंत्री अण्णासाहेब डांगे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

ईगल फाऊंडेशनच्या वर्धापन दिनानिमित्त सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रातील व्यक्तींना त्यांच्या उत्कृष्ट कामाची पोच म्हणून त्यांचा गुण गौरव व कौतुकाची थाप



राष्ट्रीय व राज्य पातळीवर देण्यात आली. शैक्षणिक व सामाजिकक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या रेखा कटके यांच्या कार्याचे परीक्षण करून राज्यस्तरीय 'गरुड झेप' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी मानपत्र, सन्मानचिन्ह व कोल्हापुरी फेटा बांधून सत्कार करण्यात आला. हा पुरस्कार म्हणजे एक वाढती जबाबदारीची जाणीव आहे, असे मत रेखा कटके यांनी व्यक्त कले. यावेळी प्रवीण काकडे, पद्मश्री दादासाहेब इदाते, डॉ. अदानी, संस्थापक अध्यक्ष विलासराव कोळेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा गुणगौरव सोहळा पार पडला.

**पश्चिम महाराष्ट्राच्या विकासाला नवे पंख** | **तब्बल नऊ वर्षांनी प्रत्यक्षात आकार घेणार**

# विरार-अलिबाग महामार्ग प्रकल्प फास्टट्रॅकवर

**। रायगड । प्रतिनिधी ।**

तब्बल नऊ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर विरार-अलिबाग मल्टीमॉडल कॉरिडॉर प्रकल्प आता प्रत्यक्षात आकार घेणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने या १२६ किलोमीटर लांबीच्या महत्त्वाकांक्षी महामार्गासाठी पुन्हा एकदा टेंडर प्रक्रिया सुरू केली असून, सरकारकडून हिरवा कंदील मिळताच कामाला गती मळिणार आहे. हा प्रकल्प बिल्ड-ऑपरेट-ट्रान्सफर (बीओटी) या पद्धतीवर खासगी कंपनीमार्फत उभारला जाणार असून, राज्याच्या पायाभूत



विकासासाठी हा टप्पा अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

२०१६ साली विरार-अलिबाग कॉरिडॉर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला होता. मात्र, विविध कारणांमुळे काम रखडले. आता राज्य सरकारने पहिला टप्पा बीबोटी मॉडेलवर मंजूर केल्यानंतर पुन्हा प्रक्रिया गतीमान झाली आहे. या महामार्गाच्या माध्यमातून विरार ते अलिबाग प्रवासाचा वेळ तब्बल ४ तासांवरून फक्त दीड तास (९० मिनिटे) इतका होणार आहे. त्यामुळे मुंबई महानगर क्षेत्रातील वाहतुकीवरील ताण कमी होईल आणि पश्चिम किनारपट्टीवरील आर्थिकदृष्ट्या सामाजिक संपर्क अधिक गतिमान बनेल. हा महामार्ग नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीटी बंदर, मुंबई-अहमदाबाद महामार्ग आणि मुंबई-गोवा महामार्ग यांना जोडणार आहे. त्यामुळे विरार, नवी मुंबई, पनवेल, पेण आणि अलिबाग या भागांमधील संपर्क व्यवस्था अधिक मजबूत होणार आहे.

### प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये

- एकूण लांबी : १२६ किमी
- पहिला टप्पा : नवघर (विरार) ते बलवली (पेण तालुका) - ९६.४ किमी
- दुसरा टप्पा : बलवली ते अलिबाग
- पद्धत : बिल्ड-ऑपरेट-ट्रान्सफर (बीओटी)
- बांधकाम आणि गुंतवणूक : खासगी कंपनीकडून
- टोलद्वारे खर्च वसुली आणि ठरावीक कालावधीनंतर महामार्ग सरकारकडे सुपूर्द
- प्रवासाचा वेळः ४ तासांवरून केवळ ९० मिनिटे
- मल्टीमोडल कनेक्टिव्हिटीचे केंद्र

### विकासाचा नवा महामार्ग

**विरार-अलिबाग मल्टीमोडल कॉरिडॉर हा फक्त एक रस्ता नाही, तर पश्चिम महाराष्ट्राच्या शाश्वत विकासाचा मार्ग आहे. हा महामार्ग सुरू झाल्यास किनारपट्टीवरील पर्यटन, उद्योग, आणि रिअल इस्टेट क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे.**

### सरकारकडून आर्थिक तरतूद

**जमीन अधिग्रहणासाठी राज्य सरकारने २ हजार कोटी रुपयांची बँक हमी देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्राथमिक टप्प्यातील निधीअभावाची अडचण दूर होऊन प्रकल्पाचा वेग वाढेल.**

# पाली शहरात पाणी गळती कायम

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

पाली नगरपंचायत हद्दीतील गांधी चौक मार्गावर गेल्या अनेक दिवसांपासून पाण्याची गळती सुरू असून, शेकडो लिटर पाणी वाया जात आहे. या गळतीमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, सार्वजनिक आरोग्यावरही धोका निर्माण झाला आहे.

याबाबत स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही नगरपंचायतीकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. काही ठिकाणी गटाराजवळच पाण्याच्या वाहिन्या फुटल्यामुळे दुषित पाणी रस्त्यावर साचत आहे, आणि त्यामुळे सांघिक आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शहरात एकीकडे पाणीटंचाईचे संकट गडद होत असताना, दुसरीकडे शेकडो लिटर पाणी रस्त्यावर वाहून जाणे नागरिकांच्या पाण्याच्या हक्कावर अन्याय करणारे असल्याचे मत स्थानिकांनी व्यक्त केले आहे. या परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून गळती सुरू आहे, परंतु नगरपंचायतीला ती दिसत नाही का? असा थेट सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी तात्काळ गळती दुरुस्त करून पाण्याचा अपव्यय थांबवावा, अशी मागणी केली आहे. तसेच, दैनंदिन देखभाल यंत्रणा सक्षम करण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# माणसे मारणारे डॉक्टर

दिल्लीतील स्फोट हा दहशतवाद्यांचे कृत्य होते हे आता स्पष्ट झाले आहे. मात्र हा नीट ठरवून केलेला नव्हे तर घाईघाईने घडवलेला स्फोट किंवा अपघात असावा अशीही एक शक्यता आहे. मात्र हे कारस्थान रचणाऱ्यांबाबतची जी माहिती आतापर्यंत पोलिसांनी दिली आहे ती अत्यंत धक्कादायक व तितकीच दुःखद आहे. काश्मिरातील काही डॉक्टर्स जैशे महंमदसारख्या धर्मांध देशद्रोही संघटनेच्या प्रभावाखाली यावेत आणि दिल्लीतच नव्हे तर देशात अन्यत्र स्फोट घडवण्याची तयारी त्यांनी करावी हे सर्वच चक्रावून टाकणारे आहे. रुग्णाचे म्हणजेच माणसाचे जीव वाचवण्यासाठी होता होईल तो शेवटपर्यंत आपण प्रयत्न करू अशी शपथ डॉक्टरकीची पदवी घेताना घ्यावी लागते. तशी शपथ घेतलेल्यांनी माणसांना मारण्यासाठी इतके भयानक व हिंसक कारस्थान रचावे हे अतर्क्य आहे. हे सर्व डॉक्टर्स सरकारी महाविद्यालयातून डॉक्टरकीची पदवी घेतलेले आहेत. याचाच अर्थ ते अत्यंत गुणवान असले पाहिजेत. विशेष म्हणजे हे सर्वजण तिशी पार केलेले आहेत. म्हणजे १८ वा २० च्या तरुण वयात काहीही कळत नसताना ते अतिरेकी झालेले नाहीत. हे सर्व जण डॉक्टरकी पूर्ण करून नोकरी करीत होते व विद्यार्थ्यांना शिकवतही होते. यातला डॉक्टर उमर नबी हा ३६ वर्षांचा होता. स्फोट ज्या आय-ट्वेंटी कारमध्ये झाला ती तोच चालवत होता असे दिसते. हा उमर अत्यंत हुशार होता व नीट-पीजी अर्थात एमडीसाठीच्या पूर्वपरिक्षेत राज्यात सर्वप्रथम आला होता. सरकारी वैद्यकीय महाविद्यालयातूनच त्याने एमबीबीएस व नंतर एमडीचे शिक्षण पूर्ण केले. दीड वर्षांपासून तो फरिदाबादच्या अल फलाह खासगी वैद्यकीय महाविद्यालयात सहायक प्राध्यापक म्हणून काम करीत होता. याच महाविद्यालयात मुझम्मिल गनाई हाही मूळचा काश्मिरचा असलेला डॉक्टर नोकरी करीत होता. तिसरा डॉक्टर अदील मजिद राठेर हा सहारनपूरमध्ये एका इस्पितळात एमडी मेडिसिन म्हणून काम करीत होता. या बहुतेकांना महिन्याला किमान दोन-तीन लाख रुपये वेतन मिळत होते. यातील उमर व मुझम्मिल यांचे लग्न नुकतेच ठरले होते तर अदीलचे लग्न अलिकडेच झाले होते.

## उच्चभ्रूंमधील धर्मांधता

काश्मीरसारख्या अत्यंत अशांत व अस्थिर प्रांतामध्ये या सर्वांना डॉक्टरकीचे शिक्षण घेता आले, ते संपवून हरियाणा व उत्तर प्रदेशसारख्या प्रांतांमध्ये चांगल्या नोकऱ्या मिळाल्या व लवकरच ते सांसारिक आयुष्यात प्रवेश करणार होते. अशा स्थितीत या डॉक्टरांनी भलत्याच मार्गाला वळावे यावरून धर्मांध विचाराचा प्रभाव माणसाची सारासार बुध्दी कसा नष्ट करू शकतो हे स्पष्ट व्हावे. २६ नोव्हेंबरच्या मुंबई हल्ल्यात सहभागी झालेले कसाब व त्याचे बाकीचे साथीदार हे अत्यंत गरीब घरांमधून आलेले होते. त्यांना मुस्लिम धर्माचा व कुराणाचा भलताच अर्थ सांगून बहकवले गेले. काफिरांना मारताना ते मेले तर ते स्वर्गात जातील व त्यांच्या स्वागताला पऱ्या असतील वगैरे त्यांना सांगितले गेले होते. कसाबने पोलिसांना दिलेल्या जबाबामध्ये या गोष्टी उघड झाल्या होत्या. आता या डॉक्टरांना धर्माची कोणती नशा दिली गेली व हे तथाकथित धर्मकृत्य त्यांनी का करावे म्हणून सांगितले गेले हे पाहावे लागेल. पण शक्यता अशी आहे की, काश्मिरमध्ये मोदी सरकारने गेल्या दहा वर्षांमध्ये ज्या प्रकारची दडपशाही केली आहे त्याचा हा थेट परिणाम असू शकेल. ३७०वे कलम रद्द केल्यावर आणि काश्मिरचा विशेष राज्याचा दर्जा काढून घेतल्यापासून केंद्राने या राज्याला लष्करी अमलाखाली ठेवले आहे. अगदी अलिकडे निवडून आलेल्या ओमर अब्दुल्ला यांच्यासारख्या मुख्यमंत्र्यांनाही तिथे काहीही किंमत नाही. अलिकडे शहीद दिनाला श्रध्दांजली वाहण्यासाठी अब्दुल्ला व इतर मंत्र्यांनी जाऊ नये म्हणून त्यांच्या बंगल्याच्या दरवाजांना पोलिसांनी बाहेरून कुलुपे लावली होती. यामुळे राज्यातील जनतेमध्ये प्रचंड संताप आहे. लष्करी व पोलिसांच्या बंदुकांमुळे हा संताप दडपला जात असला तरी तो कधी ना कधी बाहेर पडणार हे उघड होते. या डॉक्टरांच्या कटाकडे या संदर्भातच पाहायला हवे. सामान्य अशिक्षित लोकांमधील नव्हे तर शिकलेल्या व उच्चभ्रू वर्गातही हा संताप आहे व हातात शस्त्रे घेऊन व्यवस्था उलथून टाकण्याची भावना त्यांच्यात निर्माण होते आहे हे या निमित्ताने नोंदवायला हवे.

## मरणाऱ्यांमध्ये मुस्लिमही आहेत

हे कारस्थान करणारे पाकिस्तानी जैशे महंमदवाल्यांच्या संपर्कात होते असे म्हणतात. हे अतिरेकी सध्या तुर्कस्तान व अफगाणिस्तानात बसलेले आहेत अशी माहिती आहे. बांगलादेशात शेख हसिना यांचे सरकार उलथल्यानंतर जमाते इस्लामीचा जोर वाढला आहे. शिवाय बांगलादेशचे सरकार पाकिस्तानच्या अधिकाधिक जवळ जाऊ लागले आहे. तिकडूनही यासाठी काही रसद आली असण्याची शक्यता आहे. मुस्लिम समाजातील धर्मांधता, कट्टरता जगभरच वाढीला लागली आहे. हे आजचेच नव्हे तर गेल्या अनेक वर्षांपासूनचे चित्र आहे. यातूनच ओसामा बिन लादेनने २००१मध्ये अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला केला. त्याचा पुढचा भाग म्हणजे इराक व इतर भागात आयसिस उदयाला आली. तिने क्रूरतेची परिसीमा गाठली. आता आयसिसचा जोर कमी झाला असला तरी अरब देशांमध्ये अनेक छोटे धर्मांध गट कार्यरत आहेत. एकेकाळी अत्यंत प्रगत असलेला इराणसारखा देश आता मागास कट्टरतावाद्यांच्या ताब्यात गेला आहे. स्त्रियांनी बुरखा घातला नाही तर त्यांना मारहाण करण्याचे प्रकार तिथे होत आहेत. मुस्लिम धर्मांधतेची दिशा ही समाजाला काळोखाकडे घेऊन जाणारी आहे. काश्मीरमध्ये पूर्वापार वेगळेपणाची भावना व चळवळ होती. पण तेथील जनता कट्टर धर्मांधांच्या आहारी गेलेली नव्हती. म्हणूनच आम्हाला पाकिस्तानात जायचे नसून स्वतंत्र राहायचे आहे असे या जनतेचे म्हणणे होते. पण मोदींसारखी सरकारे सामान्य नागरिकांनाही कट्टरतावादाकडे ढकलत आहेत की काय असा प्रश्न निर्माण होतो. पहलगाममध्ये २२ एप्रिलला अतिरेकी हल्ला झाला. काश्मिरी जनतेने एकमुखाने त्याचा निषेध केला व हिंदू पर्यटकांना जिवावर उदार होऊन मदत केली. पण इकडे देशामध्ये सर्व काश्मिरींना देशद्रोही ठरवून त्यांच्यावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन संघ परिवारातील मंडळींनी केले. अशा प्रकारामुळे जे कट्टर नाहीत तेही धर्मांधतेकडे जाऊ शकतात हेही हे परिवारवाले लक्षात घेत नाहीत. दिल्लीचा स्फोट हे त्याचेच उदाहरण आहे. मात्र अशा स्फोटांमुळे काहीही साध्य होत नसते हे धर्मांधतेचा विचार करणाऱ्यांनी ध्यानात ठेवायला हवे. हा स्फोट घडवणारे मुस्लिम असल्याचे निमित्त करून हिंदुत्ववादी आपला मुसलमान द्वेषाचा कार्यक्रम पुढे रेटणार असतील तर तोही यशस्वी होणार नाही. कारण, कालच्या स्फोटात तीन गरीब व सामान्य मुस्लिमांचाही बळी गेला आहे. त्यातून देशभरच्या मुस्लिमांमध्ये या अतिरेक्यांबाबत झाली तर घृणाच निर्माण होईल हे लक्षात ठेवायला हवे.

विचार

# स्वदेशी अभियानातून वस्त्रोद्योगाला उभारी

***अमेरिकेने भारतावर निर्बंध घातल्याचा परिणाम जाणवू नये, म्हणून केंद्र सरकारने जसा अन्य देशांशी व्यापार वाढवण्याचा निर्णय घेतला आहे, त्याच प्रकारे देशांतर्गत बाजारात उठाव वाढावा म्हणून जीएसटी करांची फेररचना केली. त्याचबरोबर स्वदेशी अभियानाच्या माध्यमातून देशातील वस्तूंची खरेदी वाढावी यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. त्याचा वस्त्रोद्योगाला मोठा आधार मिळाला आहे. वस्त्रोद्योग क्षेत्रातील या भरारीचा वेध.***



**- प्रा. सुखदेव बखळे**

केंद्र सरकारने देशभरात स्वदेशी मोहीम सुरू करण्याची घोषणा केली आहे. या मोहिमेचा उद्देश हातमाग, हस्तकला आणि घरगुती कापड उत्पादनांची मागणी वाढवणे हा आहे. विशेषतः शहरी तरुणांमध्ये आणि 'जनरेशन झेड' वर या अभियानाचा परिणाम झाला, तर भारतात देशांतर्गत उत्पादित कापडाची मागणी दर वर्षी नऊ-दहा टक्क्यांनी वाढेल आणि २०३० पर्यंत ती २५० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचेल. वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या मते, २०२४ मध्ये भारताची कापड आणि वस्त्रोद्योग बाजारपेठ १७९ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचली होती. गेल्या वर्षी तिचा वार्षिक वाढीचा दर अंदाजे सात टक्के होता. देशातील उत्पादित कापडाचा देशांतर्गत बाजारपेठेतील वाटा ५८ टक्के आहे आणि तो अंदाजे ८.१९ टक्क्यांनी वाढत आहे. परदेशातून आयात केलेल्या कपड्याचा वापर २१ टक्के असून वार्षिक ६.७९ टक्क्यांनी वाढत आहे. घरगुती कापड उत्पादनांची मागणी वाढवण्यासाठी तरुणांना आणि शहरी वर्गाला सहभागी करून घेण्याचे महत्त्व या आकडेवारीवरून स्पष्ट होते. भारतीय कापडांना तरुणांमध्ये अभिमान आणि शैलीचे प्रतीक बनवणे, हा स्वदेशी मोहिमेमागील प्राथमिक उद्देश आहे. या उपक्रमामुळे केवळ तरुण ग्राहकांमध्ये स्वदेशी उत्पादनांची स्वीकृती वाढणार नाही, तर वीणकर, कारागीर आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी (एमएसएमई) उत्पन्न आणि बाजारपेठेच्या संधीदेखील वाढतील. या उपक्रमांतर्गत विविध मंत्रालये, सार्वजनिक क्षेत्रातील युनिट्स आणि शैक्षणिक संस्थांना त्यांच्या कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी गणवेश आणि सजावटीमध्ये भारतीय बनावटीचे कापड स्वीकारण्यास प्रोत्साहित केले जाईल.

सरकारच्या ताज्या निवेदनानुसार स्वदेशी मोहीम उत्पादन-आधारित प्रोत्साहन योजना, 'पीएम मित्र पार्क' आणि 'एक जिल्हा एक उत्पादन उपक्रम' यासह विद्यमान कार्यक्रमांना पूरक ठरेल. ही मोहीम 'सोशल मीडिया', राज्यस्तरीय भागीदारी आणि जनजागृती कार्यक्रमांद्वारे तरुणांपर्यंत पोहोचेल. याव्यतिरिक्त, जीएसटी दरांमध्ये अलिकडच्या काळात झालेल्या बदलांमुळे देशांतर्गत आणि बिगर-देशांतर्गत वापर वाढेल. यामुळे देशात कापड आणि कपड्यांची मागणी वाढू शकते. मंत्रालयाने या मोहिमेचे केंद्रबिंदू म्हणून विशेषतः शहरी तरुणांना आणि 'जनरेशन झेड' पिढीला लक्ष्य केले आहे. भारतीय कापड परिधान करणे केवळ पारंपारिकच नाही, तर स्टायलिश आणि फॅशनेबलदेखील असू शकते हे त्यांना दाखवणे हा यामागील उद्देश आहे. या उपक्रमामुळे तरुणांना स्थानिक कारागीर आणि विणकरांना पाठिंबा देण्यासाठी प्रेरणा मिळेल. स्वदेशी मोहिमेमुळे केवळ ग्राहकांना फायदा होणार नाही, तर लघु आणि मध्यम उद्योग तसेच हस्तकला उद्योगांना रोजगार आणि बाजारपेठेत प्रवेश वाढण्याची संधी मिळेल. वीणकर आणि कारागीरांना आपली उत्पादने थेट ग्राहकांना विकण्याची संधी मिळेल. त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढेल आणि स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत होईल. अशा उपक्रमांमुळे केवळ कापड उद्योगाला चालना मिळणार नाही, तर स्वदेशी उत्पादनांची जागतिक मान्यता मजबूत होईल. एकंदरीत, स्वदेशी मोहीम ही एक महत्त्वपूर्ण पायरी आहे, जी २०३० पर्यंत देशांतर्गत कापडाची मागणी २५० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवण्यास मदत करेल.

तरुणाई आणि 'जनरेशन झेड'चा सहभाग, सरकारी पाठिंबा, 'एमएसएमई'कडून मिळणारा पाठिंबा आणि 'सोशल मीडिया मोहिमा' या उपक्रमाला यशस्वी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील. भारताचा कापड उद्योग आता फक्त कपडे बनवण्यापुरता मर्यादित नाही, तर तो नवोपक्रम आणि शाश्वततेकडे एक मोठा बदल म्हणून पहात आहे. पर्यावरणपूरक कापड, डिजिटल तंत्रज्ञान आणि पुनर्वापर वाढत आहे. त्याचा पर्यावरण रक्षणालाही फायदा होत आहे. कापड उद्योग आता नवीन तंत्रज्ञान आणि 'ग्रीन थॉट'सह भविष्याकडे वाटचाल करत आहे. नवोपक्रम उद्योगाचा चेहरामोहरा बदलत आहे. कापड उद्योग जुन्या पद्धतींपेक्षा पुढे जात आहे आणि स्मार्ट कापड आणि शाश्वत उत्पादन तंत्रांचा अवलंब करत आहे. कंपन्या कृत्रिम बुद्धिमत्ता, थ्री डी प्रिंटिंग आणि 'बायोफॅब्रिकेशन'सारख्या तंत्रज्ञानाचा वापर करत असल्यामुळे कपडे चांगलेच नाहीत, तर पर्यावरणपूरकदेखील बनत आहेत. डिजिटल रंगकारी आणि पाणीरहित प्रक्रिया यासारख्या तंत्रज्ञानामुळे आता कापड उत्पादनात पाणी आणि रसायनांचा वापर कमी होत आहे. फॅशन उद्योगावर वाढत्या पर्यावरणीय दबावामुळे, ब्रँड आता शाश्वत कापडांवर भर देत आहेत. पुनर्वापर केलेले पॉलिस्टर, सेंद्रिय कापूस आणि बांबू किंवा जूटसारखे नैसर्गिक तंतू नवीन पर्याय बनत आहेत. शिवाय, अनेक कंपन्या सर्क्युलर फॅशन मॉडेल स्वीकारत आहेत. ते जुन्या कपड्यांचे नवीन कपड्यांमध्ये पुनर्वापर करतात. हा उपक्रम केवळ पर्यावरणाचे रक्षण करत नाही, तर ग्राहकांना जबाबदार खरेदी करण्यास प्रेरित करतो.

भारत जगातील सर्वात मोठ्या कापड उत्पादकांपैकी एक असून शाश्वत कापडनिर्मिती आणि व्यवहाराकडे वेगाने वळत आहे. सरकार 'मेक इन इंडिया' आणि 'टेक्सटाइल पार्क'सारख्या योजनांद्वारे हरित उत्पादनाला प्रोत्साहन देत आहे. निर्यात क्षेत्रातही शाश्वत कापडांची मागणी वाढत आहे. त्यामुळे भारताला मजबूत पाय रोवता येत आहेत. भविष्यात भारतीय कापड उद्योग आर्थिकदृष्ट्याच नव्हे, तर पर्यावरणीयदृष्ट्याही जागतिक स्तरावर आघाडीची भूमिका बजावण्यास सज्ज आहे. कापड उद्योगाचे भविष्य आता नवोपक्रम, शाश्वतता आणि तंत्रज्ञानाच्या नवीन अंतर्विरोधाशी जोडले आहे. हा बदल केवळ फॅशनची दिशा बदलत नाही, तर पृथ्वीचे भविष्यदेखील सुरक्षित करत आहे. 'ग्रीन फॅशन'चा ट्रेंड वाढला आहे. परिणामी, निसर्गावर आधारित कपड्यांची मागणी ४३ टक्क्यांनी वाढली आहे. भारतासह पाच देशांनी नैसर्गिक साहित्यापासून बनवलेले कपडे वेगाने स्वीकारले आहेत. आंतरराष्ट्रीय अहवाल आणि अभ्यासातून दिसून आले आहे, की लोक आता 'ब्रँडेड ग्लिट्झ'पासून दूर जात असून सभोवतालच्या साहित्यांसह फॅशनची व्याख्या नव्याने लिहीत आहेत. जुने कपडे, ज्यूट, बांबू, पाने, पुनर्वापर केलेले कापड आणि नैसर्गिक रंगाच्या वापरावर भर दिला जात आहे. हा ट्रेंड केवळ पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने एक ठोस पाऊल नाही, तर रासायनिक कापड आणि मायक्रोप्लास्टिकने भरलेल्या कपड्यांना जागतिक प्रतिसाददेखील बनत आहे.

संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (यूएनईपी) आणि 'ग्लोबल फॅशन अजेंडा' यांच्या 'द स्टेट ऑफ सर्क्युलर फॅशन' या संयुक्त अहवालानुसार स्वीडन, फ्रान्स, जपान, कॅनडा आणि भारत हे सर्वात वेगाने शाश्वत किंवा निसर्गअनुकूल फॅशन स्वीकारणारे आघाडीचे पाच देश आहेत. 'फॅशन थिअरी: द जर्नल ऑफ ड्रेस, बॉडी अँड कल्चर'मध्ये प्रकाशित झालेल्या या अहवालात म्हटले आहे, की २०१४ ते २०२४ या कालावधीत या देशांमध्ये निसर्गावर आधारित कापडांची (हिरवे कपडे) मागणी सरासरी ४३ टक्क्यांनी वाढली आहे. सर्वात लक्षणीय बदल स्वीडनमध्ये दिसून आला. तेथिल 'एलेन मॅकआर्थर फाउंडेशन'च्या आकडेवारीनुसार, २०१५ ते २०२४ दरम्यान पुनर्नविनीकरण केलेल्या किंवा सेंद्रिय कपड्यांच्या विक्रीत ६१ टक्के वाढ झाली. 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ सस्टेनेबल फॅशन अँड टेक्सटाईल्स'मध्ये प्रकाशित झालेल्या दुसऱ्या अहवालानुसार, नैसर्गिक संसाधनांचे पुनर्नविनीकरण आणि कापडांचा पुनर्वापर यावर आधारित 'रिजनरेटिव्ह फॅशन' या मॉडेलने गेल्या पाच वर्षांमध्ये जागतिक शहरी फॅशन बाजारपेठेत लक्षणीय स्थान मिळवले आहे. स्टॉकहोम, पॅरिस, टोकियो, न्यूयॉर्क, सेऊल, मुंबई, सिडनी, बर्लिन, ॲम्स्टरडॅम, टोरंटो, सिंगापूर आणि मेलबर्न या बारा प्रमुख शहरांमध्ये केलेल्या सर्वेक्षणात आढळून आले, की अंदाजे ३८ टक्के ग्राहक आता फक्त पुनर्नविनीकरण केलेले किंवा नैसर्गिक स्रोतांपासून बनवलेले कपडे खरेदी करण्यास प्राधान्य देतात. जुन्या वस्तूंचा पुनर्वापर करणे हा एक फॅशन ट्रेंड बनला आहे. अहवालानुसार अलिकडच्या काळात 'अपसायकलिंग', जुन्या किंवा टाकून दिलेल्या वस्तूंचे पुनर्वापर करणे हा एक फॅशन ट्रेंड बनला आहे. पॅरिस, मिलान आणि टोकियो येथील फॅशन शोमध्ये, डिझायनर्स आता जुन्या जीन्स, उरलेल्या धाग्यापासून आणि कापडाच्या तुकड्यांपासून नवीन कपडे तयार करत आहेत. भारतात दिल्ली, जयपूर आणि मुंबईमधील तरुण डिझायनर्स नैसर्गिक रंग, खादी, हातमाग यांच्या माध्यमातून जुने कापड वापरुन नवे कपडे तयार करत आहेत. या सर्वांचा परिणाम प्रतिकूल परिस्थितीतही भारतीय वस्त्रोद्योगाला सावरण्यास मदतकारक होत आहे.

# दिल्ली झाली, आता पुन्हा मुंबईचा नंबर?



**संतोष राऊळ**

नुकताच दिल्लीत मोठा बॉम्बस्फोट झाला. त्यात अनेक जणं जखमी झाले असून १२ जणांना आपला जीव गमवावा लागला. या आधी देखील दिल्लीसह मुंबईत अनेक दहशतवादी हल्ले आणि बॉम्ब स्फोट झाले आहेत. असे असतानाही पुन्हा दिल्ली सारख्या अत्यंत महत्वाच्या ठिकाणी अशी घटना घडने म्हणजे केवळ दुर्दैव नाही तर सुरक्षा आणि गृह मंत्री यांची जाणून बुजून केलेली लापरवाईच आहे, अशी चर्चा सध्या जोर धरत आहे. या आधी झालेले हल्ले मुंबई नंतर दिल्ली आणि पुन्हा मुंबई असे झाले आहेत. त्यामुळे आता पुन्हा मुंबईचा नंबर? असा प्रश्न सर्वांच्या मनात उभा राहिला आहे.

मुंबईत १२ मार्च, १९९३ साली बॉम्बे स्टॉक एक्सचेंज आणि एअर इंडिया इमारतीसारख्या प्रमुख आर्थिक आणि व्यावसायिक केंद्रांना लक्ष करत बॉम्ब स्फोट घडविण्यात आले होते. भारतात डी-कंपनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एका गटाने हे हल्ले केले होते. १९९२ मध्ये आयोध्यातील बाबरी मस्जिद पाडल्याचा बदला यावेळी घेण्यात आला होता. त्यावेळी २५०हून अधिक लोक ठार झाले होते तर सुमारे ७०० जणं जखमी झाले होते. त्यानंतर २००१ साली दिल्लीतील सांसद भवनवर देखील पाच दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. त्यात ९ जण ठार झाले तर १५ जणं जखमी झाले होते. त्यानंतर पुन्हा मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया आणि झवेरी बाजारात टॅक्सीकॅबमध्ये दोन बॉम्बस्फोट झाले. त्यात ५० पेक्षा जास्त जणांना आपला जीव गमवावा लागला होता तर सुमारे १०० जणं जखमी झाले होते. २००५ साली दिवाळीच्या तोडांवर दिल्लीमध्ये तीन ठिकाणी स्फोट घडविण्यात आले होते. त्यातील दोन स्फोट हे सरोजिनी नगर आणि पहाडगंज या गजबजलेल्या बाजारपेठांमध्ये घडविण्यात आले. तर तिसरा स्फोट गोविंदपुरी परिसरातील एका बसमध्ये घडविण्यात आला होता. दिवाळीचा सण तोंडावर असल्याने येथील बाजारपेठांत मोठ्या प्रमाणात खरेदीसाठी गर्दी होती. त्यामुळे दहशतवाद्यांनी गर्दीचा फायदा घेत याठिकाणी पार्क केलेल्या वाहनांमध्ये बॉम्ब ठेवल्याचे वृत्त समोर आले होते. या स्फोटात देखील ५० पेक्षा जास्त जणांना आपला जीव गमवावा लागला होता. तसेच, २०० पेक्षा जास्त जणं गंभीर जखमी झाले होते. त्यानंतर संपुर्ण देशाला हादरवून टाकणारा बॉम्ब हल्ला मुंबईत घडला. यावेळी एक-दोन ठिकाणी नाही, तर तब्बल केवळ ११ मिनिटांच्या कालावधीत सात समन्वित स्फोट झाले. हे स्फोट २००६ साली पश्चिम रेल्वे मार्गावर घडविण्यात आले होते. त्यात माहिम, वांद्रे आणि माटुंगा यासह अनेक स्थानकांजवळ गाड्या येत असताना हे स्फोट झाले आहेत. यात १८९ जणांना आपला जीव गमवावा लागला होता, तर ८०० पेक्षा जास्त जण गंभीर जखमी झाले होते. आणि सर्वात दुर्दैवाची गोष्ट म्हणजे या हल्लयाच्या संशयितांना नुकतेच निर्दोष सोडण्यात आले. याचा अर्थ असा की, २००६ साली झालेले हे साखळी बॉम्बस्फोट अदृष्य दहशतवाद्यांनी घडवून आणलेत की काय, अशी चर्चा होत होती. त्यानंतर २००८ साली दिल्लीतील करोल बागमधील तीन शॉपिंग मार्केटमध्ये काही मिनिटांत पाच बॉम्बस्फोट झाले होते. त्यात किमान २५ जण ठार झाले, तर १०० हून अधिक जखमी झाले होते. त्यांनतर लगेचच देशासह जगाला ओलीस धरणारा हल्ला मुंबईत झाला होता. ज्या हल्लाला २६/११ म्हणून ओळखले जाते. हा दहशतवादी हल्ला देखील २००८ सालीच झाला होता. या हल्ल्याच्या जखमा आजही मुंबईसह भारतीयांच्या मनात जीवंत आहेत. मुंबईतील ताजमहाल हॉटेल, ऑबेराय ट्रायडंट हॉटेल, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस रेल्वे स्टेशन आणि ज्यू आउटरीच सेंटरसह शहरातील महत्वाच्या ठिकाणी हल्ला झाला होता. त्यात किमान १७४ जणं ठार झाले होते. त्यात फक्त एक दहशतवादी कसाब याला जीवंत पकडण्यात आले आणि त्याला फाशीची शिक्षा देण्यात आली. त्यानंतर पुन्हा २०११ साली मुंबईतील झवेरी बाजार, ऑपेरा हाऊस आणि दादरमधील कबुतर खाना या तीन समन्वित बॉम्बस्फोट झाले. त्यात २० हून अधिक जण ठार झाले तर सुमारे १३० जण जखमी झाले होते.

त्यामुळे भारताच्या राजधानीसह आर्थिक राजधानी तब्बल आठ वेळा हादरली आहे. त्यातच पुन्हा आता सोमवारी झालेल्या बॉम्बस्फोटाने दिल्ली हादरली आहे. देशात एवढे बॉम्बस्फोट झालेत तरी सुरक्षा मंत्री आणि गृहमंत्री अद्यापही झोपेत असल्याची चर्चा रंगली आहे. तसेच, दहशतवादी हल्ले आणि बाम्बस्फोटचा घटनाक्रम पाहता मुंबई नंतर दिल्ली आणि पुन्हा मुंबई असे हल्ले झाले आहेत. त्यामुळे आता पुन्हा मुंबईत दहशतवादी हल्ला घडणार की काय, अशी चर्चा जोर धरत आहे.

लोकसंसद

## कधी थांबणार बिबट्यांचे हल्ले?

बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे स्वतःच्या संरक्षणासाठी जुन्नरमध्ये शेतकरी महिलांनी गळ्यात टोकदार खिळे असलेला पट्टा घातलेला व्हिडिओ वायरल झाला असतानाच कोल्हापूर शहरात भरवस्तीत घुसलेल्या बिबट्याने दहशत निर्माण करून घातलेल्या धुमाकूळाची बातमी येऊन थडकली. खरे तर आता अशा बातम्या नेहमीच्याच झाल्या असून बिबट्यांची वाढती संख्या आणि त्यांचे गावाच्या, शहरांच्या वेशीवर येऊन मानवी वस्तीवरील हल्ले आणि त्यातून नागरिकांचा जीव जाणे हा चिंतेचा विषय ठरला आहे. बिबट्याची समस्या केवळ पुणे जिल्ह्यापुरती सीमित राहिली नसून संपूर्ण राज्यभरात अनुभवास येत आहे. एकीकडे सिंचनामुळे उसाचे क्षेत्र वाढल्याने आणि त्याचवेळी वनक्षेत्र घटल्याने बिबट्यांची उसाचा सहारा घेतला आहे. गाई-गुरे, शेळ्या-मेंढ्या, कोंबड्या, मोकाट कुत्री यासारख्या खाद्यामुळे मानवी वस्तीत बिबट्यांचा वावर वाढला आहे. मानवी वस्तीवर होणाऱ्या बिबट्याच्या हल्ल्याच्या घटना वाढल्या असताना मानव-बिबटे यांच्यातील संघर्ष रोखण्यासाठी गांभीर्याने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज आहे. तातडीचे उपाय म्हणून राज्याच्या वनविभागाकडून बिबट्याचा वावर असलेल्या संवेदनशील गावांमध्ये एआय प्रणाली, सौर आधारित रात्री देखरेख करणारे ड्रोन कॅमेरे, पिंजरे आणि ध्वनी अलर्ट सिस्टम बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांवर काही प्रमाणात नियंत्रण येईल अशी अपेक्षा आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## अखेर स्फोट झाला...

सरकार आणि विविध राज्यातील पोलिस काही आतंकवादी आणि त्यांच्याकडील विघातक समान पकडण्यात यश मिळाले होते. परंतु सर्वत्र पसरलेल्या आतंकवादाची मुळे उखडून काढणे सहज शक्य नाही आहे. याचाच परिणाम म्हणजे लाल किल्ल्याजवळील प्रसिद्ध चांदणी चौकामधील मेट्रो स्थानकाच्या प्रवेशद्वार १ जवळ सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास एका पाठोपाठ अनेक स्फोट झाले. या स्फोटासाठी संशयित म्हणून पकडलेले काही आतंकवादी ही चक्क डॉक्टर आहेत. विद्याविभूषित आतंकवादी ह्यांना भारतात मोठा घातपात घडविण्यासाठीच पाठविले होते.एकूणच काय महा भयंकर कट असल्याचा दावा आहे परंतु पोलिसांनी अजूनही तपास चालू आहे. हा लागलेला रोग बरा करायचा असेल तर तो त्यांना योग्य भाषेत उत्तर देऊनच.. सरकार आणि पोलीस यांनी सक्षम पावले उचलण्याची गरज आहे कारण मृतदेह हे सामान्य व्यक्तीचे जरी असले तरी ते भारतीय होते हे विसरून चालणार नाही. ऑपरेशन सिन्दुर हे अंतर्गत भारतात सुद्धा करावे लागेल अशी चिन्हे निर्माण झाली आहेत. थोडक्यात पण महत्वाचे सतर्क राहूया आणि इतरांनाही तसे राहण्यास उद्युक्त करूया.

**श्री आल्हाद माळगांवकर, पनवेल**

दिनविशेष

# रवींद्रनाथ टागोर यांना 'गीतांजली' काव्यसंग्रहासाठी नोबेल पुरस्कार जाहीर

१९१३ मध्ये आजच्याच दिवशी साहित्यात नोबेल पारितोषिक जिंकणारे रवींद्रनाथ टागोर पहिले बिगर-युरोपियन ठरले. १३ नोव्हेंबर १९१३ रोजी, टागोर यांना पहिले बिगर-युरोपियन साहित्य पुरस्कार विजेते म्हणून घोषित करण्यात आले. बंगालमधील कवी, कादंबरीकार, निबंधकार, तत्वज्ञानी आणि संगीतकार हे साहित्यातील नोबेल पारितोषिक जिंकणारे पहिले गीतकार देखील बनले ङ्कङ्कत्यांच्या अत्यंत संवेदनशील, ताज्या आणि सुंदर काव्यासाठी, ज्याद्वारे त्यांनी परिपूर्ण कौशल्याने, त्यांच्या स्वतःच्या इंग्रजी शब्दांमध्ये व्यक्त केलेले काव्यात्मक विचार, पश्चिमेकडील साहित्याचा एक भाग बनवले आहेत. रवींद्रनाथ टागोर यांना नोबेल पारितोषिक मिळालेल्या 'गीतांजली'च्या प्रस्तावनेत, डब्ल्यू.बी. येट्स यांनी लिहिले आहे की, ''आपण अशी लांबलचक पुस्तके लिहितो जिथे लेखनाला आनंद देण्यासाठी कोणत्याही पानात कदाचित कोणताही गुण नसतो, काही सामान्य रचनेवर विश्वास ठेवतो, जसे आपण लढतो आणि पैसे कमवतो आणि राजकारणाने आपले डोके भरतो - सर्व कंटाळवाण्या गोष्टी - तर श्री. टागोर, भारतीय संस्कृतीप्रमाणेच, आत्म्याचा शोध घेण्यास आणि त्याच्या उत्स्फूर्ततेला स्वतःला समर्पित करण्यात समाधानी आहेत.ङ्कङ्क भारताचे राष्ट्रगीत 'जन गण मन' आणि बांगलादेशचे राष्ट्रगीत 'अमर सोनार बांग्ला' चे लेखक रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी पश्चिम बंगालमधील जोरसांको, कोलकाता येथे झाला. अतुलनीय साहित्यिक आणि महान क्रांतिकारक रवींद्रनाथ टागोर यांना कबिगुरु आणि गुरुदेव या नावांनीही ओळखले जाते. अष्टपैलू प्रतिभा असलेल्या रवींद्रनाथ टागोर यांनी वयाच्या अवघ्या ८ व्या वर्षी त्यांची पहिली कविता लिहिली आणि त्यांची पहिली लघुकथा वयाच्या १६ व्या वर्षी प्रकाशित झाली. रवींद्रनाथ टागोर यांनी एक महान क्रांतिकारक म्हणून स्वातंत्र्यलढ्यात आपल्या लेखणीतून क्रांतीची ठिणगी लोकांच्या हृदयात जागवली होती. यासोबतच जालियनवाला बाग हत्याकांडाच्या निषेधार्थ त्यांनी 'नाइटहूड' ही पदवीही परत केली होती. त्यांचे विचार आजही समर्पक आहेत, ज्याचे अनुसरण करून एखादी व्यक्ती आपल्या जीवनाला एक नवीन दिशा देऊ शकते. अशा परिस्थितीत, रवींद्रनाथ टागोर यांच्या जयंतीदिनी, तुम्ही त्यांचे हे १० मौल्यवान विचार तुमच्या प्रियजनांसोबत शेअर करून त्यांना अभिवादन करू शकता. भारताच्या इतिहासात रवींद्रनाथ टागोरांचे योगदान महत्वपूर्ण आहे.रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी बंगालमधील जोजासांको या ठिकाणी झाला. रवींद्रनाथ टागोरांनी भारताच्या आणि बांग्लादेशच्या राष्ट्रगीताची निर्मिती केली. त्यांनी कला, साहित्य क्षेत्रात मोठं योगदान दिलं. भारत आणि बांग्लादेश या दोन राष्ट्रांचे राष्ट्रगीत लिहिणारे रवींद्रनाथ टागोर हे जगातले एकमेव कवी आहेत. रविंद्रनाथांनी वयाच्या आठव्या वर्षी आपले पहिले काव्य लिहिलं होतं तर १६ व्या वर्षी त्यांची पहिली लघुकथा प्रकाशित झाली होती. रवींद्रनाथ टागोर यांनी साहित्यामध्ये दोन हजारांहून अधिक रचना केल्या आहेत. त्यांनी हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतात आपलं योगदान दिलं. मगीतांजलीफ या काव्यरचनेसाठी १९१३ साली त्यांना साहित्याचा नोबेल पुरस्कार प्राप्त झाला. साहित्याचा नोबेल मिळवणारे ते आशियातील पहिले व्यक्ती होते. विद्यार्थ्यांनी शाळेच्या चार भिंतींच्या बाहेर पडून निसर्गाच्या सानिध्यात शिक्षण घेतलं पाहिजे या विचारातून त्यांनी शांतिनिकेतनची सुरुवात केली. रवींद्रनाथ टागोर हे नावाजलेले चित्रकारही होते. त्यांनी या क्षेत्रात अनेक प्रसिद्ध कलाकृतींची निर्मिती केली आहे. रवींद्रनाथ टागोर यांचे विचार राष्ट्रवादी आणि मानवतावादी होते. त्यांनी त्यासाठी शेवटपर्यंत काम केलं. रवींद्रनाथ टागोर यांना ब्रिटिश सरकारने 'सर' ही पदवी दिली होती. जालियनवाला बाग हत्याकांडाच्या निषेधार्थ त्यांनी ती परत केली.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१३ नोव्हेंबर

१)श्रीम.सुहासिनी रमेश मांजरेकर
मु.सारळ, अलिबाग,
१३-११-१९४२
२)श्रीम.भारती मधुकर म्हात्रे
बामणोली, अलिबाग
१३-११-१९५०
३)श्री.जगदीश दत्तात्रेय घरत
वरसोली, अलिबाग
१३-११-१९५३
४)श्री.विजयकुमार काशिनाथ पाटील
नागडोंगरी, अलिबाग
१३-११-१९५३
५)श्री.तुळशीदास हाशा वरसोलकर
मेटपाडा, अलिबाग
१३-११-१९५२
६)श्रीम.चंद्रकला चंद्रकांत देवरूखकर
मु.गोंधळपाडा, अलिबाग
१३-११-१९३९

## गुटखा विकणाऱ्या दोघांना बेड्या

। मुंबई । प्रतिनिधी ।

वडाळा पूर्वेकडील आदर्श नगरात बेकायदेशीरपणे गुटख्याची विक्री करणाऱ्या दोघांना वडाळा टीटी पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून एक लाख ३५ हजार रुपये किमतीचा गुटखा जप्त करण्यात आला. वडाळा-चेंबूर मार्गावरील आदर्शनगर बस स्टॉपजवळ काही व्यक्ती बंदी असतानाही बेकायदेशीरपणे गुटख्याची विक्री करीत असल्याची माहिती वडाळा टीटी पोलिसांना मिळाली. पोलीस निरीक्षक भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक किरण नवले यांनी त्याठिकाणी धडक देऊन गुटख्याचा साठा जप्त केला. तसेच गुटखा विकणाऱ्या राजा धारकर (३०) आणि जुबेर शेख (४०) या दोघांना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून एक लाख ३५ हजार किमतीचा गुटख्याचा साठा जप्त करण्यात आला.

# पथदिव्यांचे काम रखडले

## ● पालघर उड्डाणपूल अंधारात; राष्ट्रीय महामार्ग, रेल्वेचा समन्वयअभाव

। पालघर । प्रतिनिधी ।

राष्ट्रीय महामार्ग १६०अ वरील पालघर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळील महत्त्वाचा रेल्वे उड्डाणपूल डिसेंबर २०२३ पासून वाहतुकीसाठी सुरू करण्यात आला आहे. मात्र अद्यापपर्यंत या पुलावर पथदिवे सुरू झालेले नाहीत. हा पूल दोन वर्षांहून अधिक काळ अंधारात असल्याने वाहनचालक आणि पादचारी नागरिकांना रात्रीच्या वेळी मोठा धोका पत्करावा लागत आहे.



पालघर शहराच्या पूर्व-पश्चिम भागाला जोडणारा छत्रपती शिवाजी महाराज चौका जवळील पालघरपासून सिन्नर असा राष्ट्रीय महामार्ग मुख्य वाहतुकीचा मार्ग म्हणून ओळखला जातो. या मार्गावरील पालघर येथील जुना उड्डाणपूल बंद झाल्यानंतर, नव्याने बांधलेला हा पूल दोन वर्षांपूर्वी वाहतुकीसाठी सुरू करण्यात आला. नवली उड्डाणपूल देखील वाहतुकीसाठी खुला झाल्यामुळे पूर्व-पश्चिम प्रवास करणाऱ्या नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. मात्र शहरातील फाटक बंद झाल्यामुळे नागरिक आणि वाहनचालकांना आता पूर्व-पश्चिम प्रवासासाठी या उड्डाणपुलांचाच वापर करावा लागत आहे.

दोन वर्षापासून वाहतुकीसाठी सुरू असलेला हा उड्डाणपूल अंधारातच आहे. पथदिवे बसवण्यासाठी सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीला विद्युत खांब आणून ठेवण्यात आले होते. एक महिन्याच्या विलंबाने ४ ऑक्टोबर रोजी हे खांब उभे करण्यात आले. मात्र, खांब उभे राहून महिना उलटून गेला तरी, अद्याप त्यावर दिवे सुरू झालेले नाहीत. त्यामुळे मुख्य महामार्गावर असूनही हा पूल रात्रीच्या वेळी पूर्णपणे अंधारात असतो. राष्ट्रीय महामार्ग आणि रेल्वे प्राधिकरण या दोन सरकारी विभागांमधील या समन्वयाच्या अभावाचा थेट परिणाम सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेवर होत आहे.

याबाबत रेल्वे प्राधिकरणाशी व नगर परिषदेच्या विभागाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही. तसेच महावितरण कडे विचारले असता हे काम नगर परिषदेकडे असल्याचे सांगण्यात आले आहे.

### रेल्वेची जबाबदारी– सतीश मोडक

या समस्येबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे शाखा अभियंता सतीश मोडक यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी या विलंबाचे कारण स्पष्ट केले. त्यांच्या माहितीनुसार, या उड्डाणपुलावरील पथदिव्यांचे काम रेल्वे विभागाने करायचे आहे. रेल्वेकडून हे काम पूर्ण करण्याची जबाबदारी आहे. हा उड्डाणपूल अद्याप आमच्याकडे हस्तांतरित झालेला नसून याची देखभाल दुरुस्तीची प्रक्रिया देखील रेल्वेकडे असल्याचे त्यांनी सांगितले.

## अनधिकृत कॉल सेंटरवर छापा

### पाच जणांना अटक

। मुंबई । प्रतिनिधी ।

अंतरराष्ट्रीय बँकेकडून कर्ज मंजूर करून देण्याचे अमिष दाखवून अनेकांची फसवणूक करणाऱ्या एका अनधिकृत कॉल सेंटरवर मंगळवारी (दि.११) मुलुंड पोलिसांनी छापा टाकला. पोलिसांनी कॉल सेंटर चालवणाऱ्या पाच जणांना अटक केली असून त्यांच्याकडून लॅपटॉप, मोबाइल आणि इतर साहित्य जप्त केले.

गेल्या काही दिवसांपासून मुलुंड कॉलनी परिसरात काहीजण बनावट कॉल सेंटरच्या माध्यमातून नागरिकांची फसवणूक करीत असल्याची माहिती मुलुंड पोलिसांना मिळाली. खात्री करून घेतल्यानंतर पोलिसांनी मंगळवारी या कॉल सेंटरवर छापा घातला. एका घरात अनधिकृतरित्या कॉल सेटर चालविण्यात येत असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी पोलिसांनी पाच जणांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून दोन लॅपटॉप, ११ मोबाइल, रोख रक्कम आणि इतर साहित्य जप्त केले. आरोपी नागरिकांशी फोनवरून संपर्क साधून वा संदेश पाठवून अंतरराष्ट्रीय बँकेकडून कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवत होते. कर्ज घेण्यासाठी एखाद्याने होकार देताच विविध शुल्कापोटी त्याच्याकडून मोठी रक्कम उकळण्यात येत होती. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## डांबरीकरणानंतर लगेचच रस्ता खोदला

। पनवेल । प्रतिनिधी ।

कामोठे शहरातील मानसरोवर रेल्वे स्थानकाकडे जाणारा मुख्य मार्ग पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरला आहे. नुकताच डांबरीकरण करून टकाटक करण्यात आलेला हा रस्ता अवघ्या चार दिवसांतच पुन्हा खोदण्यात आल्याने नागरिकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे. पनवेल महानगरपालिकेचा हा ढिसाळ आणि बेफिकीर कारभार पुन्हा एकदा उघड झाला आहे.



गेल्या काही महिन्यांपासून हा मुख्य मार्ग अक्षरशः खड्ड्यांनी व्यापलेला होता. त्यामुळे वाहनचालकांना व पादचाऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. अनेकवेळा नागरिकांनी सामाजिक माध्यमांवरून आणि थेट पालिकेकडे तक्रारी करून या रस्त्याची दुरवस्था मांडली होती. शेवटी नागरिकांच्या संतप्त प्रतिक्रियांमुळे पालिका जागी झाली आणि काही आठवड्यांपूर्वी कोट्यवधी रुपयांचा खर्च करून या मार्गावर डांबरीकरण करण्यात आले. डांबरीकरणानंतर काही दिवस तरी रस्ता सुरळीत राहील अशी अपेक्षा होती; परंतु पालिकेच्या निष्काळजी कारभारामुळे ही आशा फोल ठरली. डांबरीकरण झाल्याला चारच दिवस झाले असताना पुन्हा या रस्त्यावर खोदकाम सुरू करण्यात आले आहे. सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी ठेकेदारामार्फत हे काम चालू असून या खोदकामामुळे रस्त्याचा पुन्हा बोजवारा उडाला आहे. पालिका प्रशासनाकडून कामांचे नियोजन आणि समन्वयाचा पूर्ण अभाव असल्याचे यावरून स्पष्ट होते. एका विभागाने डांबरीकरण करून घेतल्यावर दुसऱ्याच विभागाकडून खोदकाम सुरू होणे, हे प्रशासनातील संवादाअभावी होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

## विद्यार्थ्यांनी दिली शिवनेरी किल्ल्याला भेट

। मुंबई । प्रतिनिधी ।



छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मस्थळी शिवनेरी किल्ल्यावर मीरारोड पूर्वेतील पेणकर पाडा आणि शांतीपार्क येथील विद्यार्थी वर्गासाठी सहलीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ४०७ विद्यार्थ्यांसह १८ पालकांचा समावेश होता. छत्रपती शिवाजी महाराज चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही सहल आयोजित करण्यात आली. या एकदिवसीय सहलीमध्ये संस्थेकडून इतिहासाचे तीन विशेष मार्गदर्शक (गाईड) नेमण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शिवनेरी किल्ला आणि इतिहासाच्या पाऊलखुणा या संदर्भात माहिती दिली. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत महत्वपूर्ण योगदान ठरेल. शिवनेरी किल्ल्याची माहिती व्हावी, यासाठी ही सहल आयोजित केल्याचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ पवार यांनी सांगितले. यादरम्यान छत्रपती शिवाजी महाराज चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ पवार यांनी सांगितले की, आजच्या तरुण पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास समजावा. त्याच्यातील एक गुण जरी येणाऱ्या पिढीने अंगीकृत केला, तर त्यांचे जीवन आदर्शवत होईल.

### विवाहितेची आत्महत्या

**रत्नागिरी** : वरवडे येथील विवाहितेने मानसिक संतुलन बिघडल्याने गळफास घेत आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी (दि.११) दुपारी घडली. अनिशा अनिल गोरे (३३) असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. अनिशाचे गेल्या सहा महिन्यांपासून मानसिक संतूलन बिघडलेले असल्यामुळे ती तणावाखाली होती. मंगळवारी ती आणि तिचा १० वर्षांचा मुलगा घरात असे दोघच घरात असताना अनिशाने राहत्या घराच्या भालाला ओढणीने गळफास घेतला.



## शेतकऱ्याला दोन रुपये नुकसान भरपाई

। पालघर । प्रतिनिधी ।

अवकाळी पावसाने एकीकडे थैमान घातले असताना शेतकऱ्याच्या पाठीशी उभे राहायला सरकार आहे कुठे, असा सवाल उपस्थित केला जात आहे. पावसाची संततधार मात्र अजूनही सुरूच असल्याने शेतकरी पूर्णपणे संपुष्टात आला आहे. शिलोत्तर गावातील एका शेतकऱ्याला प्रधानमंत्री फसल विमा योजनेमार्फत चक्क २ रुपये ३० पैसे नुकसान भरपाई आली आहे. शेतकऱ्यांची सुरू असणारी ही थट्टा बघून आता हसायचे की रडायचे, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.

शिलोत्तर गावातील मधुकर बाबुराव पाटील या शेतकऱ्याने पीक विमा काढला असून त्याच्या पिकाच्या नुकसानीचे पंचनामे देखील करण्यात आले होते. शासनाकडून त्याला १ हजार रुपयांची नुकसान भरपाई देण्यात आली आहे. मात्र पिकांचे नुकसान त्याहून अधिक असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. प्रधानमंत्री फसल योजनेमार्फत तर भरपाईच्या नावाने थट्टा केल्याचे त्यांचे म्हणणे असून चक्क २ रुपये ३० रुपयांची भरपाई त्यांच्या नावे कुडूस येथील एका बँकेत जमा झाली आहे. नुकसान भरपाईचा हा प्रकार कुणाच्या चुकीमुळे झाला आहे की खरंच सरकारच्या दप्तरात शेतकऱ्यांची किंमत इतकीच शिल्लक आहे, असा सवाल करीत मधुकर यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

> पावसाने हाहाकार माजवला असून शेतीवर अवलंबून असणारे आमच्यासारखे शेतकरी आज मेटाकुटीला आले आहेत. सरकारकडून मदतीची अपेक्षा होती मात्र २ रुपये भरपाई ही कुचेष्टा असून शेतकऱ्याच्या जखमेवर मीठ चोळण्याचा हा प्रकार आहे.
>
> –मधुकर पाटील, पीडित शेतकरी, शिलोत्तर.

## राष्ट्रीय जल पुरस्कारांमध्ये महाराष्ट्र सर्वोत्कृष्ट

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

जलसंरक्षण आणि जलव्यवस्थापनातील उत्कृष्ट कामगिरी करीत महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळवला आहे. गुजरात दुसऱ्या तर हरियाणा तिसऱ्या क्रमांकावर आहे. स्थानिक स्वराज्य संस्था गटात नवी मुंबई महापालिकेने प्रथम पुरस्कार तर पाणी वापर संस्थामध्ये नाशिक जिल्ह्यातील कानिफनाथ संस्थेने व्दितीय क्रमांक पटकावला आहे.



केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या जलसंसाधन, नदीविकास आणि गंगा संरक्षण विभागातर्फे जलसंरक्षण आणि जलव्यवस्थापनातील उत्कृष्ट कामगिरीला प्रोत्साहन देण्यासाठी देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय जल पुरस्कारांची घोषणा जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी मंगळवारी केली. पुरस्कार वितरण येत्या १८ नोव्हेंबरला नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत होणार आहे. देशातील प्रत्येक स्तरावर जलसंरक्षण आणि जलसाक्षरतेला चालना देणे हा या पुरस्कारांचा मुख्य उद्देश असल्याचे पाटील यांनी सांगितले.

यंदा १० विविध श्रेणींमध्ये संयुक्त विजेत्यांसह एकूण ४६ संस्था आणि व्यक्तींना पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. या पुरस्कारांसाठी देशभरातून ७५१ अर्ज प्राप्त झाले होते. केंद्रीय जल आयोग आणि केंद्रीय भूजल मंडळ यांनी प्रत्यक्ष पाहणी करून तपशीलवार अहवाल सादर केले. त्यानंतर स्वतंत्र निर्णायक मंडळाने विजेत्यांची निवड केली आहे.

पुरस्कारांच्या प्रमुख श्रेणींमध्ये सर्वश्रेष्ठ जिल्हा, ग्रामपंचायत, शहरी स्थानिक संस्था, शाळा किंवा महाविद्यालय, उद्योग, जलवापरकर्ता संघ, संस्था किंवा संशोधन केंद्र, नागरी समाज किंवा एनजीओ आणि वैयक्तिक योगदान (जलयोद्धा) यांचा समावेश आहे. प्रशस्तिपत्र, चांदीची ट्रॉफी आणि श्रेणीनुसार एक लाख ते ५ लाख रुपयांपर्यंत रोख पारितोषिक असे पुरस्कारांचे स्वरूप आहे.

### पोलिसांची नेहमीच राहणार गस्त | दुर्घटनांना बसणार आळा

# गणपतीपुळे समुद्रकिनारी सुरक्षा वाढवणार

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

सागरी किनाऱ्यावरील सर्व स्थानिक व्यावसायिक, जीवरक्षक देवस्थानचे सुरक्षारक्षक व ग्राम सुरक्षा रक्षक दलाचे सदस्य, पोलिस पाटील आणि स्थानिक ग्रामस्थ यांनी सतर्क राहून सुरक्षेच्या दृष्टीने कटाक्षाने आणि गांभीर्याने लक्ष घालून पर्यटकांना समुद्राच्या धोक्याबाबत योग्य त्या सूचना व माहिती देऊन पोलीस यंत्रणेला सहकार्य करावे, असे आवाहन करतानाच याचबरोबर दर शनिवार, रविवारी आणि सुट्टीच्या हंगामात समुद्रकिनाऱ्यावर ज्यादा पोलीस कर्मचाऱ्यांची गस्त वाढविली जाईल, असे जयगड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संजय पाटील यांनी सांगितले.



रत्नागिरी तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र व निसर्गरम्य पर्यटन स्थळ गणपतीपुळे समुद्रकिनाऱ्यावरील पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्वच यंत्रणांनी सतर्क राहता यावे या उद्देशाने जयगड पोलीस ठाण्याच्या वतीने गणपतीपुळे देवस्थानच्या सभागृहात आयोजित विशेष बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. पोलिस निरीक्षक संजय पाटील पुढे म्हणाले, गणपतीपुळे समुद्रकिनाऱ्यावर गेल्या काही दिवसांपासून समुद्रात पर्यटक बुडण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. हे लक्षात घेऊन स्थानिक व्यावसायिक, जीवरक्षक व ग्रामस्थांनी सतर्क राहून येणाऱ्या भक्त व पर्यटकांना वातावरणातील बदलामुळे होणाऱ्या समुद्राच्या भौगोलिक स्थितीची माहिती देऊन समुद्रात पडलेले चाळ व खड्डे आदींबाबत सूचना कराव्यात तसेच येणाऱ्या भक्त व पर्यटकांनी समुद्राच्या खोल पाण्यात आंघोळीसाठी जाऊ नये, समुद्राच्या कमी पाण्यातच आंघोळीसाठी उतरावे, त्याचबरोबर शक्यतो लहान मुलांना समुद्राच्या पाण्यात पाण्यात नेऊ नये, अशा सूचना भक्त व पर्यटकांनी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

या बैठकीला संस्थान श्री देव गणपतीपुळेचे सरपंच नीलेश कोल्हटकर, पंच डॉ. श्रीराम केळकर, विद्याधर शेंडे, मालगुंड गणपतीपुळे पोलीस चौकीचे पोलीस उपनिरीक्षक संदीप साळवी, उपसरपंच संजय माने, परिसरातील पोलिस पाटील, व्यावसायिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. समुद्रकिनाऱ्यावर पोलीस कर्मचाऱ्यांची नेहमीच गस्त राहणार आहे. त्यामुळे पोलीस यंत्रणेला संबंधित स्थानिक व्यावसायिक, जीवरक्षक आणि ग्रामस्थांनी योग्यप्रकारे सहकार्य करावे व समुद्राच्या पाण्यात बुडणाऱ्या पर्यटकांवर लक्ष ठेवून दुर्घटनेला आळा घालण्यासाठी सर्वांनी सतर्क रहावे, अशा सूचना पोलीस निरीक्षक पाटील यांनी या विशेष बैठकीत केल्या.

## निवडक

### गांजाची तस्करी उघडकीस; तरुण पोलिसांच्या जाळ्यात

**चिपळूण** : मुंबई-गोवा महामार्गावरच्या सवतसडा धबधब्यानजीक गांजा विकण्यासाठी आलेल्या तरुणाला चिपळूण पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. ही घटना सोमवारी (दि.१०) घडली. ऐन निवडणुकीत घडलेल्या घटनेमुळे तालुक्यात खळबळ उडाला असून याप्रकरणी राकेश वसंत पडवेकर (पेढे-कुंभारवाडी) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्याकडून १९,५६० रुपये किंमतीचा ३२६ ग्रॅम गांजा पोलिसांनी जप्त केला आहे. राकेश हा मुंबई-गोवा महामार्गावरच्या सवतसडा धबधब्यानजीक गांजा विकण्यासाठी येत असल्याची गोपनीय माहिती चिपळूण पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी प्रकाश बेले तसेच पोलीस निरीक्षक फुलचंद मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हा प्रकटीकरण विभागाच्या सोमवारी सवतसडा धबधबा परिसरात सापळा रचला. अखेर त्याठिकाणी राकेश येताच त्याचावर या पथकाने धाड टाकली. सुरुवातीला राकेश याने पोलिसांना उडवाउडावीची उत्तरे दिली. मात्र त्याची तपासणी केल्यानंतर त्याच्याकडून १९,५६० रुपये किंमतीचा ३२६ ग्रॅम गांजा पोलिसांनी जप्त केला आहे. सध्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली आहे. अशा स्थितीत गांजा प्रकरणी राकेश पडवेकर याच्यावर झालेल्या कारवाईमुळे खळबळ उडाली आहे. या गांजाप्रकरणी आणखी कोणाचा तरी सहभाग असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, राकेश याने हा गांजा कोणाकडून आणला शिवाय तो कोणाला विकत होता? पोलीस चौकशीतून स्पष्ट होणार आहे.



### कीर्तनात नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**माणगाव** : गुरुनानक देवजींच्या गुरुपुरबच्या पवित्र दिनानिमित्त पाली येथे भव्य नगर कीर्तनाचे आयोजन करण्यात आले. मुंबई, पनवेल, माणगाव तसेच रायगड जिल्ह्यातील विविध ठिकाणांहून मोठ्या संख्येने सिख समाजातील भाविकांनी या नगर कीर्तनात उत्साहाने सहभाग नोंदविला. सकाळी गुरु ग्रंथ साहिबजींची प्रकाश स्थापना करून कीर्तनाची सुरुवात झाली. नगर कीर्तनाची भव्य पालखी पाली येथून सुरू होऊन गुरुद्वारा गुरु नानक दरबार येथे संपन्न झाली. मार्गात संगतांनी सतनाम वाहेगुरु, धन गुरु नानक धन गुरुनानक, वाहेगुरुजी का खालसा, वाहेगुरु जी की फतेह या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले. विविध ठिकाणी स्थानिक नागरिकांनी फुलांचा वर्षाव, आरती करून स्वागत केले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे एकता, प्रेम आणि सेवाभावाचा संदेश देणाऱ्या या नगर कीर्तनात सर्व धर्मीय नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.





### केईएम रुग्णालयात गलथान कारभार

**मुंबई** : राज्यासह देशभरातून परळ येथील केईएम रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याबद्दल राज्याचे कॅबिनेट व मुंबईशहराचे सहपालक मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. संगीता रावत यांना जाब विचारला. यावेळी रुगालयात केवळ नोंद करण्यासाठी रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना दोन-तीन तास ताटकळत उभे राहावे लागत असल्याचे चित्र मंत्री लोढा यांच्या निदर्शनास आले. याबाबत त्यांनी तीव्र संताप व्यक्त करत प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. पुढील आठवड्यापर्यंत रूग्णांना योग्य आणि वेळेत उपचार जर मिळाले नाहीत, तर पुन्हा रुग्णालयाचा दौरा करून संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा इशाराही मंत्री लोढा यांनी यावेळी दिला. गेल्या २५ वर्षात मुंबई पालिकेच्या गलथान व ढिसाळ व्यवस्था उभी असून त्याचा सामान्य जनतेला आजही त्याचा भुर्दंड बसत असल्याचा आरोप लोढा यांनी केला आहे. या पाहणी दौऱ्यादरम्यान रुग्णांनी आणि त्यांच्या नातेवाईकांनी रुग्णालयाच्या ढिसाळ आणि घोटाळेबाज कारभाराचा पाढाच वाचला. रुग्णांची नोंदणी करणारा विभाग अतिशय अरुंद आहे, त्यात साधे पंखेही नाहीत. एकाच जागेवर हजारोंच्या संख्येने लोक तिष्ठत बसलेले असतात. जुनी इमारत दोन माळ्यांची तर नवी इमारत १३ माळ्यांची असून अनेकदा लिफ्ट बंद असल्याचे रूग्णांच्या नातेवाईकांनी सांगितले.

### जेलीफिशमुळे मच्छिमार त्रस्त

**रत्नागिरी** : रत्नागिरी शहराजवळील पांढरा समुद्र किनारपट्टीवरील मच्छीमारांचे हाल सध्या वाढले आहेत. पारंपरिक रापण पद्धतीने मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांना गेल्या काही दिवसांपासून जाळ्यात मोठ्या प्रमाणात जेलीफिश सापडत आहे. परिणामी, त्यांची मेहनत, वेळ आणि



खर्च सगळेच पाण्यात जात आहेत. समुद्रावर उपजीविका अवलंबून असलेल्या मच्छीमारांचे उत्पन्न घटल्याने त्यांच्यासमोर उपजीविकेचा प्रश्न उभा राहिला आहे. पांढरा किनाऱ्यावर दररोज पहाटे मच्छीमारांचे गट २० ते २५ जणांच्या टीमने समुद्रात उतरतात. सोमवारी पहाटे २ वाजता टाकलेली रापण ओढायला तब्बल पाच तासांचा कालावधी लागला. मात्र, हाती लागलेले उत्पन्न केवळ काही किलो बांगडा, कर्ली, खवली असा किरकोळ मासा आणि त्याच्याही दुप्पट प्रमाणात जेलीफिश! रापणीत सापडलेला जेलीफिश फेकताना मच्छीमारांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. कारण जेलीफिशच्या स्पर्शामुळे शरीरावर खाज सुटणे, सूज येणे आणि काही वेळा जळजळ होणे अशा समस्या निर्माण होतात. त्यामुळे मच्छीमारांच्या आरोग्याला धोक्या पोहचण्याची शक्यता आहे. मत्स्य तज्ज्ञांच्या मते, समुद्राच्या पाण्याचे तापमान वाढल्यामुळे आणि प्रदूषणामुळे झराम किनाऱ्याजवळ मोठ्या प्रमाणात वाढतो. समुद्रात नद्या मिसळण्याच्या ठिकाणी पाण्यातील पोषक घटक वाढतात, त्यामुळेही झराम प्रजनन करतो. अशावेळी तो माशांच्या नैसर्गिक स्थलांतर मार्गात अडथळा निर्माण करतो. या समस्येकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्यास पुढील काही आठवड्यात झरामचा प्रादुर्भाव अधिक वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे मत्स्य विभागाने समुद्रातील पाण्याचे तापमान, ऑक्सिजन पातळी आणि प्रदूषणाचा अभ्यास करून तातडीने उपाययोजना हाती घेणे अत्यावश्यक असल्याचे मत स्थानिकांनी व्यक्त केले आहे.

# निवडक



## माणगाव तहसील कार्यालयासमोर निदर्शने

**माणगाव** :राज्य सरकारी कर्मचारी-शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्षवेधण्याकरीता माणगाव तहसील कार्यालय समोर (दि.११) नोव्हेंबर रोजी निदर्शने करण्यात आली. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना तालुका शाखा माणगाव तथा शिक्षक समन्वय समिती तालुका शाखा माळेगाव यांच्या संयुक्त विद्यमानाने मध्यवर्तीचे तालुकाध्यक्ष राजेंद्र खाडे यांच्या नेतृत्वाखाली शासनाचा लक्ष वेधण्यासाठी निदर्शने आंदोलन करण्यात आले. यावेळी रायगड जिल्हा शिक्षक समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष सुरेश पालकर उपस्थित होते. यावेळी मध्यवर्तीचे सरचिटणीस दाढेल संघटनेचे प्रतिनिधी शाम राठोड, खोपकर, सुर्वे, बावधने, तृप्ती पवार, उतेकर आदी कर्मचारी उपस्थित होते महसूल नायब तहसीलदार अरविंद घुमड यांना निवेदन तहसीलदारांच्या वतीने देण्यात आले.



## दाट धुक्यामुळे वाहतुकीस अडथळा

नागोठणे : सध्या जिल्ह्यात धुक्याची चादर पसरली आहे. त्यातच वातावरणात बदल होवून गुलाबी थंडीची चाहूल लागली आहे. त्यामुळे वातावरण बदल होत आहे. पहाटेच्या वेळेस मुंबई गोवा महामार्गावर दाट धुक्याची चादर पसरल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. दाट धुक्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील समोरील काहीच दिसत नसल्यामुळे बऱ्याचशा वाहन चालकांनी पहाटेच्या सुमारास वाहने रस्त्याच्या बाजुला किंवा सुरक्षित ठिकाणी पार्किंग करुन धुकं कमी होण्याची वाट पाहण्याची वेळ वाहन चालकांवर आली आहे.



## विद्यार्थ्यांचा आगळावेगळा उपक्रम

**माणगाव :** माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या इंग्रजी माध्यम शाळेतील इयत्ता पहिलीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी टाकाऊतून टिकाऊ वस्तू तयार करून सृजनशीलतेचा आगळावेगळा नमुना सादर केला आहे. नारळाच्या करवंट्या, बाटल्यांचे झाकण, प्लास्टिकचे तुकडे, जुन्या कागदांपासून त्यांनी आकर्षक वस्तू शोपीस, तबला, फुलदाणी, प्राण्यांच्या प्रतिकृती आणि घरगुती सजावटीच्या वस्तू तयार केल्या. लहान मुलांच्या कल्पकतेतून साकारलेल्या या वस्तूंनी प्रदर्शनात सर्वांचे लक्ष वेधून घेतले. शाळेमध्ये शिक्षणाबरोबरच कृतीतून शिकण्यावर विशेष भर दिला जातो. त्यामुळे अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांना केवळ ज्ञानच नाही तर पर्यावरणाची जाण, जबाबदारी आणि सौंदर्यदृष्टीही मिळते. माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, लहान वयातच सर्जनशीलतेचे बीज पेरणाऱ्या या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## मधुबन कट्ट्याचे महाकवी संमेलन

**चिरनेर :** मधुबन कट्टाच्या वतीने (दि.१७) नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता विमला तलाव येथे अजब दुनिया माणसांची या विषयावर १२१ वे. कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे. यानिमित्त वंदना म्हात्रे जीवन पाटील यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. याप्रसंगी प्रा. एल बी पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. दरम्यान कोमसापचे अध्यक्ष मच्छिंद्रनाथ म्हात्रे, मधुबन कट्टाचे अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे, कोमसापचे जिल्हा प्रतिनिधी संजय होळकर, कोमसापच्या कार्याध्यक्षा रंजना केणी, कोम सापच्या उपाध्यक्षा समता ठाकूर, कोमसाप बालविभाग प्रमुख संजीव पाटील, कोमसाप सचिव अजय शिवकर तसेच कोमसापचे सदस्य अनिल भोईर, नरेश पाटील, किशोर पाटील, भरत पाटील, हेमंत पाटील, दौलत पाटील, रमण पंडित, शिवप्रसाद पंडित आदी कार्यकर्ते नियोजनाच्या तयारीला लागले असल्याची माहिती कोमसापाचे अध्यक्ष मच्छिंद्रनाथ म्हात्रे यांनी दिली.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अकाउंटट पाहिजे- पात्रता B com, Tally अनुभव ५ वर्षे ठिकाण-बामणसुरे, चोंढी, पगार - २५००० महिना Contant - 9823585321
- पाहिजे- अलिबागस्थित वृद्ध जोडप्यास सकाळी साडेदहा ते दीडवाजेपर्यंत किचन मदतनीस बाई. पगार पाच हजार आणि एका वेळचे जेवण. संपर्क- ८५३०३०९७६५
- नागावमधील हॉटेलमध्ये कामासाठी रिसेप्शनिस्ट आणि हाउसकिपर इत्यादी माणसांची आवश्यक्ता आहे. मो. ९९२१९७८०८०
- Design Metrics is Hiring. Need a civil draftsman/ Site Supervisor at our Studio in Alibag. Skills required - Basic Autocad Kindly share your CV on design-metricsoffice@gmail.com Contact No - 9970051876
- श्री इलेक्ट्रीकल अँड प्लंबिंग वर्क्स, चेंढरे मारुती मंदिराशेजारी कामासाठी ड्रायव्हर, इलेक्ट्रिशन, वायरमन व प्लंबर या कामाचा अनुभव असलेली मुले पाहिजेत. प्रत्यक्ष भेटा पगार रु. १५०००/- संपर्क- ९४२२६९०८५३,७८७५६८३७७३
- समुद्रापासून पाच मिनिट अंतरावर फुल फर्निश ब्लॉक विकणे आहे. मो. ८८०५५४०४६४.
- सकाळी नाश्ता बनविण्यासाठी अलिबागमधील बाई पाहिजे. ७०६६१३८३६८.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात औषधांचा तुटवडा

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

**तालुक्यासाठी एकमेव असलेल्या उरणच्या इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात श्वान दंशानंतर लागणारे अँटी रेबीज आणि अतिशय महत्त्वाचे असलेल्या व धनुर्वाद प्रतिबंध टीटीच्या औषधांचा तुटवडा निर्माण झाला आहे. या अत्यावश्यक औषधांसाठी रुग्णांना प्रतीक्षा करावी लागत आहे. त्याचबरोबर काही काळ औषधे उपलब्ध नसल्याने रुग्णांच्या जीवतास धोका निर्माण होत आहे. वाढत्या आजारांमुळे व न परवडणाऱ्या खासगी रुग्णालयातील उपचार सर्वसामान्य नागरिकांना न परवडणारे असल्यामुळे, उरणच्या इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात रुग्णांची गर्दी होऊ लागली आहे. विविध आजरांवर उपचार घेण्यासाठी दररोज ३०० हून अधिक रुग्ण येत आहेत.**




- **न परवडणाऱ्या खासगी रुग्णालयात उपचार**
- **दररोज ३०० हून अधिक रुग्ण उपचारासाठी**

ही संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र शासनाने उरण तालुक्यातील नागरिकांसाठी १९८९ च्या लोकसंख्येवर आधारित हे रुग्णालय उभारले असून, या रुग्णालयात ३५ वर्षापूर्वीची कर्मचारी आणि वैद्यकीय अधिकारी संख्या आहे. २०१० पासून मुलांचे नागरिकांना प्रस्तावित १०० घाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाची प्रतीक्षा आहे.

उरण औद्योगिक व नागरिकांच्या दृष्टीने वाढते शहर आहे. येथील औद्योगिक परिसर आणि मुंबई, नवी मुंबई या प्रमुख शहरांना जोडणाऱ्या दळण वळणामुळे लोकसंख्याही झपाट्याने वाढत आहे.

३५ वर्षांपूर्वी उभारण्यात आलेल्या ३० खाटांचे इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय व कोप्रोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्र या दोन ठिकाणी वैद्यकीय सुविधा पुरवणारी यंत्रणा अपुरी पडत आहे. त्यामुळे उरण तालुक्यातील नागरिकांना शेजारच्या पनवेल तालुक्यातील किंवा मुंबई आणि नवी मुंबई या दोन्ही ठिकाणच्या महानगरपालिकेच्या रुग्णालयांवर अवलंबून राहावे लागत आहे. उरणच्या इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात अनेक असुविधा आहेत.

> **ग्रामीण रुग्णालयात दिवसाला दहा ते पंधरा श्वान दंशाचे रुग्ण येतात. मात्र औषधांचा साठा पुरेसा नसल्याने रुग्णांना जिल्हा रुग्णालयाकडे धाव घ्यावी लागत आहे. गेल्या काही दिवसात उरणमधील शन दंशाची संख्या वाढली आहे.**
> **-डॉ.बाबासाहेब काळेल**
> **अधीक्षक इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय**

त्यासाठी खासगी व्यावसायिक यांच्या मदतीवर अवलंबून राहावे लागत आहे.

तालुक्यात सुसज्ज असे शासकीय रुग्णालय उभारावे अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे. त्यासाठी आंदोलनही उभारले गेले आहे. त्यानंतर २०१० मध्ये शासनाने १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाला मंजूरी दिली आहे. मात्र रुग्णालयाच्या नवीन आराखड्याच्या प्रतीक्षेत नागरिक असून, या मंजूर रुग्णालयाचीही गेल्या पंधरा वर्षापासून प्रतीक्षा आहे.



## अंधश्रद्धा निर्मूलन समितीची जिल्ह्याची कार्यकारिणी जाहीर

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीरायगड जिल्हा कार्यकारिणी बैठक नुकतीच संपन्न झाली. या बैठकीत जिल्हा पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यावेळी विवेक सुभेकर यांची जिल्हा अध्यक्ष तर संदेश गायकवाड यांची जिल्हा कार्यकारी अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. यावेळी उत्कृष्ट कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी जिल्हा प्रधान सचिव म्हणून अमित निंबाळकर, वैज्ञानिक जाणिवा प्रकल्प कार्यवाह मोहन भोईर, युवा सहभाग कार्यवाह अमित गवळे, कायदेविषयक सल्लागार ॲड. संकल्प गायकवाड बुवाबाजी संघर्ष कार्यवाह नंदकिशोर राक्षे आणि महिला सहभाग कार्यवाह म्हणून योगीता डंगर यांची निवड करण्यात आली. तसेच रायगड जिल्हा उत्कृष्ट कार्यकर्ता अमित निंबाळकर, रायगड जिल्हा लक्षवेधी कार्यकर्ता दिनेश शिर्के, रायगड जिल्हा युवा कार्यकर्ता प्रमोद खांडेकर आणि रायगड जिल्हा उत्कृष्ट महिला कार्यकर्ती योगिता डंगर यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी अंधश्रद्धा निर्मूलन समिती, महाराष्ट्र ट्रस्ट अध्यक्ष गणेश चिंचोले, राज्य कार्यकारणी सदस्य प्रवीण देशमुख, राज्य सल्लागार समिती सदस्य भाऊ सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नरेश पाटील यांनी केले. यावेळी जिल्ह्यातील महा. अंनिस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सीबीएसई शाळेजवळ गतिरोधकांची मागणी

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शहरातील निजामपूर मार्गाजवळील मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई इंग्रजी माध्यम शाळेजवळ महामार्गावर वाढता वेग आणि वाहतुकीचा धोका पाहता दोन गतिरोधक तातडीने बसवावेत, अशी गंभीर आणि भावनिक मागणी शाळेच्या प्राचार्या निशिगंधा मयेकर यांनी केली आहे.



याठिकाणी दररोज सुमारे ३०० विद्यार्थी, शिक्षक आणि पालक या परिसरातून शाळेकडे ये-जा करतात. परंतु शाळेजवळ गतिरोधक नसल्याने महामार्गावरून भरधाव वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे अपघातांचा धोका कायम आहे. अनेक वेळा किरकोळ अपघात घडले असून पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

शाळेजवळील महामार्गावर वेगमर्यादा आणि सावधानतेचे फलक लावून दोन ठिकाणी मजबूत गतिरोधक बसविण्याची तातडीने आवश्यकता आहे. स्थानिक नागरिक, पालक संघ आणि शिक्षकवर्ग यांनीही या मागणीला पाठिंबा दिला आहे. त्यांनी बांधकाम विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने तत्काळ तपासणी करून आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी केली आहे.

## विद्यार्थ्यांना व्यावसायिक मार्गदर्शन

**। खांब । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथे (दि. १०) नोव्हेंबर रोजी विद्यार्थ्यांना व्यावसायिक करिअर मार्गदर्शनपर देण्यात आले. संस्थेचे चेअरमन महेंद्र पोटफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी एम. जी. एल. प्रबोधन कौशल्य निकेतन पहल-नर्चरिंग लाईव्स माणगावच्या वतीने सदरील व्यावसायिक करिअर मार्गदर्शनपर विशेष मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजनकरण्यात आलेहोते.यावेळी निकेतन पहल-नर्चरिंग लाईव्स माणगावचे मार्गदर्शक सुरेश दळवी आणि रूपेश सुतार यांनी असिस्टंट इलेक्ट्रीशियन, आरसीडब्ल्यू टेक्निशियन, नर्सिंग असिस्टंट, ब्युटी थेरपिस्ट, टेलरिंग, मोबाईल रिपेअरिंग, गॅस आणि ऑईल पाईप फिटर आदी व्यावसायांच्या प्रशिक्षणाबद्दल मार्गदर्शन केले.



## प्रतिक पाटील यांचे निधन

**उरण :** उरण द्रोणागिरी उबाठा गटाचे शाखा प्रमुख प्रतिक चंद्रहास पाटील यांचे अल्पशा आजाराने सोमवारी (दि.१०) निधन झाले आहे. साधा हसरा चेहरा असलेल्या प्रतिक यांनी जनमानसांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने माजी आ. मनोहर भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न केले. त्याच्या पश्चात दोन भाऊ, बहिण आई-वडील, मामा मामी असा मोठा परिवार आहे.



## लायन्स क्लबतर्फे महाआरोग्य शिबीर

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

लायन्स क्लब खालापूर अध्यक्ष यांच्या अभिष्ठचिंतानांचे औचित्य साधत महाआरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. यावेळी शुगर, ईसीजी, नेत्र तपासणी, आदी तपासणी करण्यात आली. यासाठी मेडिकव्हर हॉस्पिटल खारघर, सनशाईन सुपर स्पेशालिस्ट हॉस्पिटल पनवेल आदी डॉक्टरांचे सहकार्य लाभले. यावेळी दिपाली पाटील, राजेश पाटील, शशिकांत पाटील, जयवंत पाटील, संतोष बैलमारे, उत्तम भोईर, नंदू पाटील, लहू भोईर, जितेंद्र सकपाळ, हरिभाऊ जाधव, मारुती ढवाळकर मंगेश पाटील, रमेश जाधव, चंद्रकांत पाटील, सूर्याजी भाऊ पाटील,संदीप जाधव,बाजीराव ढवालकर,बंटी पाटील, मछिंद्र पाटील, संजय पाटील, बबन पाटील, रमेश ढवाळकर, रमण ढवालकर, दिलीप काठावले, सचिन काठावले, रविंद्र पाटील, पुंडलिक काठावले, एकनाथ ढवाळकर, दत्तात्रय जांभळे, हरीश पाटील, विलास कांबळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयवंत पाटील यांनी केले.

## दवावर पिकणाऱ्या भाज्यांना मागणी

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा शहरासह ग्रामीण भागात दवावर पिकणाऱ्या भाज्यांना तळा बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर मागणी होत आहे.

भात काढणीनंतर तळा तालुक्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर गावठी भाज्यांचे उत्पादन घेतले जाते. यामध्ये मेथी, मुळा, पालक, माठ या भाज्यांचा समावेश असतो. सध्या दवावर पिकणाऱ्या या भाज्यांची बाजारात मोठी मागणी असून तळा परिसरातील नागरिक या भाज्यांना पहिली पसंती देतात. यामध्ये मेथी, पालक, माठ, मुळा, चाकवत, कोथिंबीरचाही समावेश आहे. तळा शहरातील बाजार परिसरात मोठ्या प्रमाणावर दवावर पिकवलेल्या गावठी भाज्या पाहायला मिळतात, त्याची आवकही वाढली आहे. तळा परिसरातील ग्रामीण भागात हिवाळ्यात भाजीपाला उत्पादन घेतले जाते. सकाळच्या वेळी तळा शहर आणि बाजारात ही भाजी विक्रीला येते. तसेच, घरोघरी फिरूनही महिला भाजी विक्री करतात. यामुळे शेतकऱ्यांनाही आर्थिक फायदा होतो. तळा तालुक्यात थंडीची चाहूल सुरू झाली असून शेतकरीही मोठ्या प्रमाणावर दवावर पिकणाऱ्या या भाज्याचे उत्पादन घेत आहेत.



## माणगावात नेत्र शिबिराला प्रतिसाद

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शहरात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव तालुक्यातील विजय मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवार (दि. १२) नोव्हेंबर रोजी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन जुने एसटी स्टॅन्ड जवळ माणगाव याठिकाणी करण्यात आले होते.

शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन ९६ रुग्णांची तपासणी करून ३२ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. सदरचे शिबीर हे दर महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या बुधवारी आयोजित केले जाते.



सदर शिबिराचा माणगाव, महाड, म्हसळा, श्रीवर्धन, तळा, पोलादपूर, रोहा आदी तालुक्यांतील रुग्णांनी घेतला आहे.

सदर शिबीर यशस्वी पार पाडण्यासाठी विजय मेथा, सुप्रिया शिंदे, तनुजा मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलचे व्यवस्थापक डॉ. प्रकाश पाटील, डॉ. श्रुती मोहन, गुरुनाथ घुले, अवंतिका गलांडे, प्रतीक्षा माने, ज्ञानोबा कांबळे यांनी सहकार्य केले. सदर शिबीर हे दर महिन्यातील एका बुधवारी आयोजित करण्यात येत असल्याने या शिबिराचा लाभ बहुजन समाजातील गरीब गरजू नेत्र रुग्णांनी अवश्य घ्यावा असे आवाहन मेथा परिवारातर्फे केले आहे.

## आंळदीकडे पायीदिंडी मार्गस्थ

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातून अनेक वर्षे आंळदीला पायी दिंडी जाते. हालिवली येथील मारुती राणे यांच्या मार्गदर्शनाखाली व दिलीप राणे नेतृत्वाखाली कर्जत तालुक्यातील हालिवली ते आंळदी अशा कोकण विभागीय पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. सकाळी दिंडी हालिवली येथून आंळदी येथे जाण्यास निघाली. या पायी दिंडीचे हे एकतीसावे वर्ष आहे.

हालिवली येथुन निघालेली पायी दिंडी रेल्वे लाईन ओलांडुन छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ आली. त्याठिकाणी कर्जतच्या माजी नगराध्यक्ष वनिता म्हसे व दत्तात्रेय म्हसे यांनी या दिंडीचे स्वागत केले. याप्रसंगी शिवलाल गुप्ता, संतोष वैद्य, दिलीप बडेकर, साजन ओसवाल, सदानंद जोशी, कृपाराम लोवंसी, लीला चंदन, सुचिता वांजळे, स्वाती देशमुख आदी उपस्थित होते. त्यानंतर ही दिंडी बाजार पेठेतून श्री कपालेश्वर मंदीरा जवळ आली. कपालेश्वर मंदिरात अभंग, भजन सादर करून पळसदरी मार्गे आंळदीकडे मार्गस्थ झाली.



### संवर्धनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन | वास्तववादी चित्रणाचे अप्रतिम उदाहरण

## पक्षी सप्ताहनिमित्त साकारले 'पक्ष्यांचे जग'

**। उरण । प्रतिनिधी ।**

ज्येष्ठ वन्यजीव अभ्यासक मारुती चित्तमपल्ली आणि ज्येष्ठ पक्षी शास्त्रज्ञ डॉ. सलीम अली यांच्या जन्मदिनांचे औचित्य साधून 'पक्षी सप्ताह' साजरा केला जातो. ०५ ते १२ नोव्हेंबर या सप्ताहात वनखाते, निसर्गप्रेमी, पक्षी मित्र हे जंगल भटकंती, पक्षी निरीक्षण व नोंदी आणि पक्षी संवर्धनाचे विविध कार्यक्रम करत असतात.

या पक्षी सप्ताहाच्या निमित्ताने फेसबुक व इंस्टाग्राम पेज वर तरुण आणि प्रतिभावान चित्रकार वरद गावंड यांनी काढलेली विविध पक्षांची चित्र ही निसर्गमित्र आणि निसर्ग संरक्षण व संवर्धन मोहिमेला चालना देणारी आहेत. या पक्षांचे जग उलगडून सांगणाऱ्या व ज्यांच्या जयंतीनिमित्त हा पक्षी सप्ताह साजरा केला जातो, ते प्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ डॉ. अली आणि ज्येष्ठ निसर्ग लेखक मारुती चितमपल्ली यांच्या निसर्ग संवर्धनातील अमूल्य योगदानाला आदरांजली म्हणून वरद यांनी या दोन महान व्यक्तिमत्त्वांची बोलकी चित्रे रेखाटली आहेत.

वरद यांनी साकारलेली ही चित्रे दोन्ही अभ्यासकांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि निसर्गाशी असलेल्या त्यांच्या अतूट बंधाचे सार प्रभावीपणे मांडतात. या कलाकृतींमधून वरद यांनी निसर्गाप्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली, तसेच या दिग्गजांच्या कार्याची आठवण म्हणून त्यांनी साकारलेले पक्षांचे जग कला रसिक आणि पक्षी प्रेमींचे लक्ष वेधून घेणारे आहे.



निसर्गातील रंगछटा, प्रकाश-छाया आणि पक्षांची मोहक मुद्रा, यांचे वास्तववादी चित्रण अप्रतिमपणे साकारले आहे. कलारसिकांना या पक्षांच्या रंगाच्या छटांचा मोह पडल्याशिवाय राहणार नाही. वरद यांच्या रंग शैलीतून पक्षांचे बाह्यरूपच नव्हे, तर त्यांच्या स्वभावाचे रंग दर्शनही आपल्याला पाहायला मिळते. प्रत्येक चित्रात वापरलेले रंग, अत्यंत नैसर्गिक, वास्तववादी आणि डोळ्यांना सुखावह करणारे आहेत. पक्ष्यांच्या पंखातील प्रत्येक बारकावे आणि त्यांच्या हालचालीमध्ये निसर्ग अधिवासातील बैठकीचा मागोवा चित्रांमध्ये उतरला आहे. आपल्या कलेच्या माध्यमातून पक्षी संवर्धनाची गरज, पर्यावरणीय महत्त्व, निसर्गातील जैव विविधतेचे संरक्षण आणि संवर्धनाच्या दृष्टीने आपल्या रंगांच्या माध्यमातून एक पाऊल टाकल्याचे समाधान चित्रकार वरद गावंड यांनी व्यक्त केले आहे.

## निवडक

### स्वप्नीलने पटकाविला आयर्नमॅनचा किताब

**पुणे** : अत्यंत खडतर आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करत पूर्ण करावी लागणारी स्पर्धा म्हणून आयर्नमॅन या स्पर्धेची क्रीडाविश्वात ख्याती आहे. उपळाई बुद्रूकचे सुपुत्र तथा आयकर



अधिकारी स्वप्नील पाटील यांनी यशस्वीपणे पूर्ण करत अधिकृतपणे 'आयर्नमॅनचा' किताब पटकावला आहे. गोवा येथे ९ ऑक्टोबर रोजी आयर्नमॅन ७०.३ आंतरराष्ट्रीय स्पर्धा झाली. यामध्ये स्वप्नील पाटील यांनी ही स्पर्धा ७ तास ५४ मिनिटांत पूर्ण केली. त्यात ११३ किलोमीटरमध्ये ९० किलोमीटर सायकलिंग, २१ किलोमीटर पळणे व दोन किलोमीटर पोहणे असा समावेश होता. या स्पर्धेत विविध देशांच्या स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. कठोर प्रशिक्षण, शिस्तबद्ध जीवन आणि अविश्रांत प्रयत्न यांच्या जोरावर स्वप्नील पाटील यांनी ही कठीणतम परीक्षा यशस्वीपणे पार करत खऱ्या अर्थाने आयर्नमॅन असल्याचं सिद्ध केले आहे. या स्पर्धेसाठी त्यांना पत्नी प्रियांका देशमुख, मित्र मंगेश चव्हाण, गणेश राख, नवनाथ अग्रवाल, रोहित देवा-झा यांचे पाठबळ मिळाले आहे. नोकरी सांभाळत त्यांनी या स्पर्धेसाठी तयारी करत. वेळेत ही स्पर्धा पूर्ण केल्याबद्दल सर्वच स्तरातून कौतुक केले जात आहे.



### कसोटीपूर्वी गिल-यशस्वीचा सराव

**नवी दिल्ली** : विंडीजविरुद्ध मायदेशातील दोन कसोटी सामन्यांत अर्धशतक आणि नाबाद शतक झळकावणारा तसेच भारताने मालिका जिंकून क्लीन स्वीप देण्यात मोलाचा वाटा उचलणाऱ्या शुभमन गिलला मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये धावांसाठी झगडावे लागले आहे. मात्र, आता भारतीय संघ पुन्हा एकदा कसोटी प्रकारात खेळणार असून गिलला लवकर फॉर्म मिळावा, अशी चाहत्यांची, संघव्यवस्थापनाची अपेक्षा असेल. या कसोटी मालिकेच्या पार्श्वभूमीवर, शुभमन गिल, यशस्वी जैस्वाल यांनी मंगळवारी पहिल्या सराव सत्रात कसून सराव केला. मर्यादित षटकांच्या फॉरमॅटमधून कसोटी फॉरमॅटशी जुळवून घेण्यासाठी वेळ आणि संयम लागतो. हे लक्षात घेता दक्षिण आफ्रिकेविरुद्ध शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्यापूर्वी भारतीय कर्णधार शुभमन गिलने मंगळवारी जवळपास दीड तास नेटमध्ये जोरदार सराव केला.

### भारतीय फुटबॉलपटूंची आर्त हाक

**नवी दिल्ली** : भारतातील सर्वात मोठी व्यावसायिक फुटबॉल स्पर्धा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इंडियन सुपर लीगला (आयएसएल) यंदाच्या मोसमात अद्याप मुहूर्त मिळालेला नाही. यामुळे फुटबॉलपटू, प्रशिक्षक, चाहत्यांचे नुकसान होत आहे. राग, निराशा अन् हतबलता वाढत चालली आहे. याच पार्श्वभूमीवर आयएसएल ही स्पर्धा पुन्हा सुरू करण्याची आर्त हाक भारतातील फुटबॉलपटूंकडून मारण्यात आली आहे. अखिल भारतीय फुटबॉल संघटना व रिलायन्स यांच्या पुढाकाराने आयएसएल ही स्पर्धा १५ वर्षे सुरू होती, मात्र कराराचे नूतनीकरण करण्यात आले नाही. त्यामुळे यंदा अद्याप या स्पर्धेचा श्रीगणेशा झालेला नाही. गेल्या आठवड्यात अखिल भारतीय फुटबॉल महासंघाकडून सांगण्यात आले की, आयएसएलच्या व्यावसायिक हक्कांसाठी मागवलेल्या प्रस्तावांना कोणतीही बोली मिळालेली नाही. ही बोली १६ ऑक्टोबरला मागवली होती. तसेच आगामी करार १५ वर्षांचा असणार होता. खेळाडू, प्रशिक्षक, चाहत्यांना स्पर्धा केव्हा सुरू होते याची प्रतीक्षा आहे. आम्ही खूप मेहनत केली. खूप काही दिले आहे. पण मोसम न खेळताच संपत चालला आहे. पुढे तो सांगतो की, संपूर्ण भारतीय फुटबॉल व्यवस्था अनिश्चिततेत आहे. स्वप्ने थांबली आहेत. भविष्य प्रश्नचिन्हाखाली आहे. प्रत्येक दिवस आम्ही थांबतो आहोत. भारतीय फुटबॉल पूर्वपदावर आणण्यासाठी कृतीची वेळ आली आहे..सुनील छेत्री व गुरप्रीत सिंग संधू या फुटबॉलपटूंनीही सोशल माध्यमावर आपले मत व्यक्त केले आहे. ते सांगतात की, आम्ही आयएसएलमध्ये खेळणारे व्यावसायिक फुटबॉलपटू एकत्र आलो आहोत. आमचा एकच संदेश आहे. आम्हाला खेळायचे आहे. तेही आता लगेच. आमचा राग, निराशा आणि वेदना आता बदलत चालली आहे. आम्हाला आमच्या चाहत्यांसमोर, कुटुंबांसमोर पुन्हा खेळायचे आहे. आमच्या प्रिय खेळाला पुन्हा उभारी देण्यासाठी जे काही करावे लागेल, ते करण्यास तयार आहोत.

# आयपीएलचा लिलाव भारताबाहेर

- अबू धाबी येथे मिनी लिलावाची तयारी
- आयपीएलच्या हंगामाची मार्चपासून होणार सुरुवात

**लिलाव कधी होईल?**
आयपीएल २०२६ चा लिलाव १५ किंवा १६ डिसेंबर रोजी होण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षी सौदी अरेबियामध्ये झालेल्या मेगा लिलावानंतर हा एक छोटासा लिलाव आहे.

**रिटेन्शनची तारीख**
१० संघांना खेळाडू कायम ठेवण्याची अंतिम तारीख १५ नोव्हेंबर आहे.चेन्नई सुपर किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स यांच्यातील ट्रेंड अंतिम टप्प्यात आहेत आणि लवकरच घोषणा होण्याची अपेक्षा आहे. संजू सॅमसन चेन्नई सुपर किंग्जमध्ये सामील होणार आहे, तर राजस्थान रॉयल्स पुढील हंगामासाठी रवींद्र जडेजाला कायम ठेवेल.



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

आयपीएल २०२६ चा हंगाम सुरू व्हायला अजून खूप अवकाश आहे. पण त्याआधी खेळाडूंचा लिलाव पार पडणार आहे. या लिलावाचे ठिकाण आणि तारीख आता समोर आली आहे. त्यानुसार आता तिसऱ्यांदा भारता बाहेर म्हणजे अबु धाबीत लिलाव पार पडणार असल्याची माहिती समोर आली आहे. १५ नोव्हेंबरपर्यंत खेळाडूंची 'रिटेन्शन' यादी जाहीर केली जाईल.

यासोबतच, आयपीएलच्या लिलावाची तारीख आणि ठिकाण देखील निश्चित झाल्याचे समजते. विशेष बाब म्हणजे, यावर्षीही खेळाडूंचा लिलाव भारताबाहेर होणार असल्याचे समोर आले आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ लवकरच याबाबत अधिकृत घोषणा करण्याची शक्यता आहे. आयपीएलचा पुढील हंगाम मार्चपासून सुरू होईल, असे मानले जात आहे.

१५ नोव्हेंबरला जाहीर होणार रिलीज आणि रिटेन खेळाडूंची यादी तयार होणार आहे. जगातील सर्वात मोठी लीग असलेल्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) बद्दल सध्या वारे वाहत आहे. १५ नोव्हेंबरपर्यंत सर्व १० संघांना आपल्या ताफ्यातील कोणते खेळाडू कायम ठेवायचे आणि कोणाला संघातून मुक्त करायचे, हे कळवावे लागणार आहे. जे खेळाडू रिलीज केले जातील, त्यांची नावे पुढील लिलावासाठी पुन्हा यादीत समाविष्ट केली जातील. यावर्षी 'मिनी ऑक्शन' होणार असल्याने, संघ हवे तेवढे खेळाडू रिलीज करू शकतात. संघांकडे असलेल्या मूळ रकमेत, रिलीज केलेल्या खेळाडूंची रक्कम जोडली जाईल, ज्यामुळे संघांना नवीन लिलावात खेळाडू खरेदी करता येतील. आयपीएल २०२६ साठीचा मिनी लिलाव भारताबाहेर आयोजित करण्याची ही सलग तिसरी वेळ असेल. यापूर्वी, २०२३ मध्ये दुबईत तर २०२४ मध्ये जेद्दाह येथे लिलावाचे आयोजन करण्यात आले होते.

यंदाचा लिलाव १५ किंवा १६ डिसेंबर रोजी होण्याची शक्यता आहे. तथापि, तारीख अजून निश्चित व्हायची आहे. तरीही, लिलाव अबू धाबीमध्येच होणार हे जवळजवळ निश्चित मानले जात आहे. सध्या 'रिटेन्शन लिस्ट'ची प्रतीक्षालिलावाला अजून अवकाश आहे, पण सध्या सर्वांचे लक्ष रिटेन्शन यादीवर लागले आहे.

संघांनी आपापल्या याद्या तयार केल्या आहेत, पण त्या अद्याप उघड झालेल्या नाहीत. रिटेन्शनमध्ये जितके मोठे खेळाडू रिलीज केले जातील, तितकाच लिलावात अधिक रोमांच निर्माण होईल. त्यामुळेच, १५ नोव्हेंबरच्या संध्याकाळकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे, जेव्हा रिटेन्शन यादी जाहीर केली जाईल.

मागील वर्षी 'मेगा ऑक्शन' झाला होता, त्यामुळे आता 'मिनी ऑक्शन'ची तयारी सुरू आहे. येत्या काही दिवसांत आयपीएल २०२६ संदर्भात चांगलीच उत्सुकता दिसून येईल.

## आयसीसी 'वनडे' रँकिंग जाहीर




| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

**रोहित अव्वल क्रमाकांवर कायम**

आयसीसीने लेटेस्ट वनडे रँकिंग जाहीर केली आहे. या नव्या रँकिंगमध्ये भारताच्या किंग कोहलीने अर्थात विराट कोहलीने टॉप फाईव्हमध्ये जागा पटकावली आहे.

आयसीसी रँकिंगनुसार ७८१ गुणांसह रोहित शर्मा नंबर वन वनडे फलंदाज आहे. चौथ्या क्रमांकावर भारताचा कसोटी कर्णधार शुभमन गिल असून त्याचे ७४५ गुण आहेत.आयसीसी रँकिंगमधील टॉप-१० वनडे बॅट्समन - रोहित शर्मा (भारत) - ७८१
इब्राहिम जादरान (अफगानिस्तान)- ७६४
डेरियल मिशेल (न्यूझिलँड)- ७४६ शुभमन गिल (भारत)- ७४५ विराट कोहली (भारत)- ७२५
चरिथ असलंका (श्रीलंका)- ७१०
बाबर आजम (पाकिस्तान)- ७०९ हैरी टेक्टर (आयरलँड)- ७०८
श्रेयस अय्यर (भारत)- ७००शाई होप (वेस्टइंडीज)- ६९० या खेळाडूंचा समावेश आयसीसी रँकिंगमध्ये केला आहे.

## विजय चौधरीची 'हिंद केसरी'साठी निवड



| मुंबई | प्रतिनिधी |

भारतीय शैली कुस्ती महासंघ व महाराष्ट्र राज्य भारतीय कुस्ती संघांच्या मान्यतेने राष्ट्रीय कुस्ती संकुल, वडकी (पुणे) येथे पार पडलेल्या हिंद केसरी निवड चाचणी कुस्ती स्पर्धेत नवी मुंबई पोलीस दलातील सहायक पोलीस आयुक्त तसेच सलग तीन वेळा ममहाराष्ट्र केसरीफविजेता आणि जागतिक पोलीस सुवर्णपदक विजेता पैलवान विजय चौधरीने दमदार व ऐतिहासिक खेळी करत हिंद केसरी स्पर्धेसा पात्रता मिळवली आहे. १५ ते २० जानेवारी २०२६ रोजी सातारा जिल्हा येथे होणारया महिंद केसरीफ स्पर्धेसाठी चौधरी यांची अधिकृत निवड जाहीर करण्यात आली आहे. निवड चाचणीदरम्यान चौधरी यांनी खेळलेल्या प्रेक्षणीय कुस्त्यांना प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत चौधरी यांनी चार सलग कुस्त्यांमध्ये विजय मिळवत आगेकूच केली. यावेळी चौधरी म्हणाला महाराष्ट्र पोलीस दलाचे पोलीस कर्तव्याबरोबरच खेळात सुद्धा महाराष्ट्र पोलिसांचे देशभर नाव उज्ज्वल ठेवणे हा माझा ध्यास आहे व कुस्ती क्षेत्रातील मानाचा हिंद केसरी किताब महाराष्ट्र पोलीस दलाच्या नावावर करण्यासाठी मी सर्वस्वाने प्रयत्न करणार आहे.

## महावितरणच्या क्रीडास्पर्धेचे अमरावतीत आयोजन




| अमरावती | प्रतिनिधी |

अमरावती येथील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या क्रीडा संकुलात राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत महावितरणच्या १६ परिमंडलाच्या संयुक्त आठ संघातील सुमारे ११७० महिला व पुरुष खेळाडू सहभागी झाले आहेत. या क्रीडा स्पर्धेत २२ खेळ प्रकारातील सामने रंगणार असून येत्या शनिवारी (दि.१५) समारोप होणार आहे. १०० मीटर धावणे स्पर्धेत प्रिया पाटील, गुलाबसिंग वसावेंची बाजी - अतिशय चुरशीच्या १०० मीटर धावस्पर्धेत पुरुष गटात गुलाबसिंग वसावे (पुणे-बारामती) यांनी सुवर्णपदक तर साईनाथ मसाणे (सांघिक कार्यालय-भांडूप) यांनी रौप्यपदक पटकावले. तर महिला गटात प्रिया पाटील (सांघिक कार्यालय-भांडूप) यांनी सुवर्णपदक तर श्वेतांबरी अंबादे (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया) यांनी रौप्यपदक मिळवले. विजेत्यांना संचालक राजेंद्र पवार यांच्याहस्ते सुवर्ण व रौप्यपदक प्रदान करण्यात आले.

याप्रसंगी दिलीप जगदाळे, प्रसाद रेशमे, भुजंग खंदारे, सुहास रंगारी, दिलीप दोडके, स्वप्नील काटकर, चंद्रमणी मिश्रा, संजय पाटील, राजेश नाईक, अरविंद बुलबुले, संजीव भोळे, संजय ढोके, राजेंद्र पांडे श्रीनिवास देशपांडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजन समितीचे अध्यक्ष अशोक साळुंके यांनी केले. सूत्रसंचालन क्षिप्रा मानकर, विजय पांडे यांनी केले तर उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे यांनी केले.

## क्वीन डिफेंडर्सने पटकावले गटविजेतेपद

**नवी दिल्ली** : जीएच रायसोनी स्मृती सांघिक बुद्धिबळ स्पर्धेत १० वर्षांखालील गटात क्वीन्स डिफेंडर्स, १२ वर्षांखालील गटात एंडगेम किंग्ज, १४ वर्षांखालील गटात पह किंग्ज, ८ वर्षांखालील गटात पह फिशर नाइट्स या संघांनी बाजी मारली तर खुल्या गटात शूरवीर संघ सात नॉनस्टॉप विजयांसह विजेता ठरला. मुंबई शहर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेने रायसोनी मेमोरियल, कल्पना प्रकाश वेल्फेअर फाऊंडेशन आणि चेस एक्सलंस संस्थेच्या वतीने आयोजित या सांघिक बुद्धिबळ स्पर्धेत ४ खेळाडूंचा समावेश असलेल्या ६७ संघांनी सहभाग नोंदवला होता. यात ८ ते १४ वर्षांखालील मुलांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. १० वर्षांखालील गटात क्वीन्स डिफेंडर्सच्या खेळाडूंनी सातपैकी पाच सामने जिंकत जोरदार खेळ केला.

## निगडोलीत टर्फचे उद्घाटन

| खोपोली | प्रतिनिधी |

खालापुर अॅडव्होकेट क्रिकेट टिमने क्रिकेट प्रॅक्टीस करीता खालापूर तालुक्यातील ग्रामीण निगडोली येथे टर्फची उभारणी करण्यात आली असता मंगळवार (दि. ४) नोव्हेंबर रोजी टर्फचे उद्घाटन दुय्यम निबंधक खालापूर गणेश चव्हाण यांच्या हस्ते पार पडल्याने सर्व वकील बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

महाराष्ट्र अॅडव्होकेट प्रिमियर लिगच्या किकेट सामन्याचे आयोजन डिसेंबर २०२५ मध्ये नाशिक येथे करण्यात आल्याने या सामन्यामध्ये खालापूर संघ अॅड. विकास म्हात्रे व अॅड. उमेश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली खेळणार असून खालापूर संघ गेली १२ वर्षे महाराष्ट्रात खालापूर तालुक्याचे नेतृत्व करीत आलेले आहे.



- महाराष्ट्र अॅडव्होकेट प्रिमियर लिगचे आयोजन

यावेळी दुय्यम निबंधक खालापुर गणेश चव्हाण, रघुनाथ फराट, रोहिदास फराट, गौतम मोरे, अॅड. विकास म्हात्रे, अॅड. उमेश पवार, अॅड. सचिन चाळके, अॅड. योगेश मानकवले, अॅड. जितेंद्र जाधव, अॅड. मनोज पाटील, अॅड. रितेश पाटील, अॅड. रोहन क्षिरसागर, अॅड. रमेश पाटील, अॅड. भगवान लाले, अॅड. जयेश तावडे, अॅड.तुषार बोंबे, अॅड. अमय सनस, अॅड. मिलीद गायकवाड, अॅड. सोमनाथ दळवी, अॅड.महेश भद्रिके, अॅड. गजानन पवार, अॅड. अनिकेत विचारे, अॅड. सनि भेलसेकरतसेच स्थानिक मोठ्या संख्येने प्रमुख उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अॅड. विकास म्हात्रे, सुत्रसंचालन अॅड. सचिन चाळके यांनी केले तर आभार अॅड. योगेश मानकवले यांनी मानले

## 'तरुणांनी क्रिकेटसह अभ्यास ही करा'

| खोपोली | प्रतिनिधी |

भारतीय क्रिकेट संघाचे माजी क्रिकेटपटू राजेश चौहान यांनी (दि.९) नोव्हेंबर रोजी खालापूर तालुक्यातील ग्रामीण केळवली गावाला भेट दिली. यावेळी केळवली गावामध्ये तरुणांनी चौहान यांचे स्वागत केले.

यावेळी चौहान म्हणाले की, तरुणांनी क्रिकेट सोबत अभ्यासात लक्ष केंद्रित करणे गरजेचे असून ज्यांना क्रिकेटमध्ये करीयर बनवायच्या नसल्यास क्रिकेट छंद म्हणून खेळावे, असे मत चौहान व्यक्त केले. तर याप्रसंगी सर्व परिसराचा आढावा चौहान घेतला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सत्यम पांडे, मदन गावानंग, सुनील दिसले, वैभव दिसले, तानाजी दिसले, पोलीस पाटील शरद दिसले, हनुमत कर्णूक, अंकुश मराडे, जयेश कर्णूक, रवींद्र देशमुख, दिनेश दिसले, समाधान दिसले, धीरज दिसले, कल्पेश दिसले, सागर दिसले, तेजस दिसले, आकाश दिसले आदी प्रमुखांसह ग्रामस्थ उपस्थित होते. तर राजेश चौहान हे १९९३ ते १९९८ दरम्यान भारतीय क्रिकेट संघाचे उजव्या हाताचे ऑफ-ब्रेक गोलंदाज होते. त्यांनी २१ कसोटी आणि ३५ एकदिवसीय सामने खेळले असून अनिल कुंबळे आणि वेंकटेश प्रसाद यांच्यासोबत १९९० च्या दशकातील भारतीय फिरकी त्रिकुटाचा भाग होते.

**मुंबई उपनगर कबड्डी असो.कबड्डी स्पर्धा** | प्ले-ग्राउंडवर भव्य दिव्य सामने संपन्न

## स्वराज्य स्पोर्टस्, महात्मा गांधी स्पोर्टस् अंतिम विजेते





| मुंबई | प्रतिनिधी |

मुंबई उपनगर कबड्डी असो. ने आयोजित केलेल्या ४३ व्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत स्वराज्य स्पोर्टस्, महात्मा गांधी स्पोर्टस् कुमारी गटात अनुक्रमे पूर्व व पश्चिम विभागात विजेतेपद पटकाविले. गजानन मंडळ व पार्ले महोत्सव स्पोर्टस् अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने आ. पराग आळवणी, आयोजक मिलिंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार्ले येथील प्ले-ग्राउंडवर हे सामने संपन्न झाले. पूर्व विभागातील कुमारी गटाच्या अंतिम सामन्यात कांजूरच्या स्वराज्य स्पोर्टस् ने कुर्ल्याच्या एस. आय. इ. एस. चा ४७-२२ असा पराभव करीत विजेते पदाला गवसणी घातली. आंतर राष्ट्रीय खेळाडू सेरेना म्हसकरचा धुव्वादार खेळ तिला सानिया इंगळे, मधुरा सावंत यांची मिळालेली चढाई पकडीची साथ यामुळे स्वराज्यने विश्रांतीला २४-०४ अशी भक्कम आघाडी घेतली होती. विश्रांतीनंतर मात्र, एस. आय. इ. एस. च्या आस्था सिंग, तनुश्री शिंदे यांनी आपला खेळ उंचावत कडवी लढत दिली. पण संघाला विजेतेपद मिळवून देण्यात त्या कमी पडल्या.

पश्चिम विभागातील कुमारी गटाच्या अंतिम सामन्यात बांद्राच्या महात्मा गांधी स्पोर्टस्ने मालाडच्या आकाश मंडळाला ३९-१७ असे नमवीत जेतेपदाचा चषक उंचावला. पूर्वार्धात १९-०७ अशी आघाडी घेणाऱ्या महात्माने उत्तरार्धात देखील आपल्या खेळाची गती कायम राखत आपला विजय सोपा केला. पूजा चिंदरकर, प्रतिक्षा सर्वसाने यांच्या चढाई पकडीच्या सर्वांगसुंदर खेळाला याचे श्रेय जाते. आकाशच्या तन्वी बारगुडे, शलाका मर्ढेकर बऱ्या खेळल्या. या अगोदर झालेल्या कुमारी गटाच्या पूर्व विभागात स्वराज्य स्पोर्टस्ने स्नेह विकासचा ५२-१७ असा, तर एस. आय. इ. एस. ने शिवकन्या मंडळाचा ३०-०६ असा पराभव करीत अंतिम फेरी गाठली. पश्चिम विभागातील कुमारी गटाच्या उपांत्य फेरीत महात्मा गांधीने माऊली प्रतिष्ठानला ३५-०८ असे, तर आकाश स्पोर्टस्ने निवारा हिड इंडियला ३२-१२ असे नमवीत अंतिम फेरीत धडक दिली होती. या स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ स्पर्धा आयोजक मिलिंद शिंदे, समाजसेविका मनीषा शिंदे, जिल्हा संघटनेचे कार्याध्यक्ष सुधाकर घाग, सचिव राजेश पडेलकर, यांच्या उपस्थितीत पार पडला.

## अमॅच्युअर तायक्वांदोची कार्यकारिणी जाहीर



| रसायनी | प्रतिनिधी |

रसायनी येथे अमॅच्युअर तायक्वांदो असोसिएशन, रायगडची सर्वसाधारण सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या सभेला रायगड जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, पंच आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.या सभेमध्ये नवनियुक्त कार्यकारिणी जाहीर करुन नवनियुक्त अध्यक्ष व उपाध्यक्षांच्या नावांची घोषणा करण्यात आली. तसेच खुली जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धा २०२५ च्या नियोजनही करण्यात आले. या सभेमध्ये संदीप सुदाम मुंढे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली, सचिन माळी हे सचिवपदी, रोहित सिनलकर हे खजिनदारपदी, उपाध्यक्षपदी प्रतीक गायकवाड आणि दिनेश पडाया, तसेच सदस्यपदी सौरभ नवले, अमोल माळी, सचिन मोरे,संजय भोईर आणि गणेश राठोड यांची निवड करण्यात आली. राष्ट्रीय पंच म्हणून प्रथम ठोंबरे, विशाल चव्हाण, अब्दुल यांची निवड करण्यात आली. अध्यक्षपदी संदिप मुंढे तर सचिवपदी सचिन माळी यांची निवड झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)